मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | रविवार, २७ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२७ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये
Email : vrittamanas1@gmail. com

## राहुल व वायनाडचे नाते अधिक मजबूत करेन!



**वायनाड :** काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी वाड्रा यांनी वायनाडच्या लोकांना एक खुले पत्र लिहून म्हटले, मी राहुल आणि वायनाडमधील नाते अधिक दृढ करेन. X वर शेअर केलेल्या पत्रात त्यांनी लिहिले, लोकप्रतिनिधी म्हणून ही माझी पहिलीच यात्रा असेल, पण फायटर म्हणून ही माझी पहिली यात्रा नसेल. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी केरळमधील वायनाड आणि उत्तर प्रदेशातील रायबरेली लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले होते. त्यांनी रायबरेली ही गांधी घराण्याची पारंपारिक जागा निवडली आणि वायनाड सोडले.



## हिंदू समाज एकसंध रहावा ही आमची इच्छा!

पान 8

## म ह त्त्वा चे

### टीम इंडियाचा पराभव, कसोटी मालिका गमावली

**पुणे :** न्यूझीलंडने पुण्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यांत 113 धावांनी विजय मिळवत तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत 2-0 अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. किवी संघाने बंगळुरू येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात आठ गडी राखून विजय मिळवला होता. भारतीय संघाकडून पुनरागमन करण्याच्या मोठ्या अपेक्षा होत्या, परंतु रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाला ते करण्यात अपयश आले. या सामन्यात न्यूझीलंडने विजयासाठी 359 धावांच्या लक्ष्याला दिले होते. प्रत्युत्तर देताना टीम इंडिया दुसऱ्या डावात 245 धावांवर आटोपली आणि सलग दुसरा सामना गमावला.

**सविस्तर वृत्त पान 7 वर**

### नाशिकमध्ये माय-लेकासह मामाचा नदीत बुडून मृत्यू



**नाशिक :** नाशिकच्या नांदगावमधून दुर्दैवी घटना समोर आली आहे. नाशिकच्या नांदगावमध्ये तिघांचा नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर दुर्दैवी घटना घडल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे. नाशिकच्या नांदगाव तालुक्यातील माय-लेकरासह मामाचा नदीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नाशिकच्या नांदगाव तालुक्यातील बाणगंगा नदीजवळ ही घटना घडली आहे. एकाच घरातील तिघांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

**सविस्तर वृत्त पान 6 वर**

### अमेरिकन निवडणुकीत चित्रपट कलाकारांचा प्रचार

**वॉशिंग्टन :** अमेरिकेत 5 नोव्हेंबरला होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचे काउंटडाऊन सुरू झाले आहे. आता केवळ 10 दिवस उरले आहेत. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस या निवडणुकीत मतदारांना आपल्या बाजूने करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. आता दोन्ही बाजूंनी हॉलिवूड चित्रपटसृष्टीतील स्टार्सनी आपल्या पसंतीच्या उमेदवाराचा दावा बळकट करण्यासाठी निवडणूक प्रचारात उतरले आहेत. फोर्ब्सच्या अहवालानुसार, क्रीडा आणि चित्रपट कलाकारांना आशा आहे की अशा प्रकारे राजकारण्यांना पाठिंबा दिल्यास त्यांच्या चाहत्यांवर त्याचा प्रभाव पडेल आणि ते निवडणुकीच्या निकालांवर प्रभाव टाकू शकतील.एकीकडे टेलर स्विफ्ट, लिओनार्डो डिकॅप्रियो, ओप्रा विन्फ्रे, बियॉन्से आणि ख्रिस रॉक या सेलिब्रिटींनी कमला हॅरिसना पाठिंबा दिला आहे, तर दुसरीकडे जेसन एल्डियन, ली ग्रीनवूड, एलोन मस्क, किड रॉक आणि रोझेन बार यांसारखे स्टार्स ट्रम्प यांना पाठिंबा देत आहेत.



# महाविकास आघाडीत जागावाटपाचा तिढा कायम

## 'तुझं माझं जमेना आणि तुझ्या वाचून करमेना', अशी तिन्ही पक्षांची अवस्था

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मुदत संपायला अवघे दोन दिवसांचा अवधी शिल्लक असताना, अद्यापही महाविकास आघाडीत जागा वाटपावरून मतभेद सुरूच आहेत. मुंबई आणि दिल्लीत याबाबत सतत बैठकांचं सत्र सुरू आहे. अद्याप यावर अंतिम तोडगा निघत नाही. काँग्रेस आणि ठाकरे सेना यांच्यात मुंबई आणि विदर्भातील जागांवरून मतभेद असल्यानं हा तिढा अद्याप कायम आहे.

2019 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसनं राज्यात 147 जागा लढवल्या होत्या. यंदा त्यांना शंभरी सुद्धा गाठता येत नाही. या कारणानं काँग्रेस नेते, राहुल गांधी यांनी राज्यातील काँग्रेस नेत्यांना जबाबदार ठरवलंय. दुसरीकडं नाना पटोले यांनी व्यथित होऊन उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना या संदर्भात लिहिलेल्या पत्रानं महाविकास आघाडीत खळबळ उडाली आहे. थोडक्यात, महाविकास आघाडीची सध्याची स्थिती, 'तुझं माझं जमेना आणि तुझ्या वाचून करमेना' अशी झाली.

लोकसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर महाविकास आघाडीनं विधानसभा निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली. मागील चार महिन्यांपासून यासंदर्भात जागा वाटपाची चर्चा आहे. परंतु, आता उमेदवारी अर्ज भरायला केवल दोन दिवसाचा अवधी शिल्लक असताना अद्यापही जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. आधी प्रत्येक पक्षासाठी 85-85-85 असा फॉर्म्युला ठरला होता. त्यानंतर यामध्ये वाढ होऊन प्रत्येकी 90-90- 90 जागा आणि उरलेल्या 18 जागा मित्र पक्षांना दिल्या जातील, अशी माहिती काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली होती. तरीही अद्याप जागा वाटपासंदर्भात बैठकांचं सत्र सुरू असून अंतिम घोषणा न होऊ शकल्यानं काँग्रेस नेते राहुल गांधी नाराज झाले आहेत.

**नाना पटोले यांच्या पत्राने वाद**

दुसरीकडं नाना पटोलेंचं पत्र वादाच्या भोवऱ्यात सापडलं असून महाविकास आघाडीत जागा वाटपाचा तिढा कायम आहे. अशात संजय राऊत यांनी काही जागांची अदलाबदली होऊ शकते, असे संकेत दिले. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अनेक ठिकाणी परस्पर उमेदवार जाहीर केले आहेत. विशेष करून विदर्भात 12 जागी उद्धव ठाकरेंनी परस्पर उमेदवार जाहीर केल्यानं काँग्रेसमध्ये तीव्र नाराजी आहे. विदर्भातील सर्वात जास्त जागा लढण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असताना, उद्धव ठाकरे यांच्याकडून त्याला 'खो' घातला जात आहे. म्हणूनच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नाराजी व्यक्त करणारं पत्र उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना लिहिलंय. या पत्रामुळं उद्धव ठाकरे नाराज झाल्याच्या चर्चा आहेत.

दिल्लीत सीईसीच्या बैठकीदरम्यान राज्यातील अनेक विवादित जागांवर सखोल चर्चा झाली. त्यावर तोडगा काढण्यासाठी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्याचंही ठरलं. परंतु ही चर्चा होण्याअगोदरच उद्धव ठाकरे यांनी उमेदवार घोषित केल्यानं काँग्रेसमध्ये नाराजी पसरली. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्यातील मतभेद टोकाला गेले असले तरी, काँग्रेसला शिवसेना (उबाठा)शिवाय पर्याय नसल्यानं काँग्रेस विचित्र कोंडीत सापडली आहे.

## उमेदवारी यादीनंतर नाराजीचे फटाके

## मविआतील तिन्ही पक्षांसह भाजपकडून दुसरी उमेदवार यादी जाहीर

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास अवघ्या 2 दिवसांचा कालावधी शिल्लक असताना शनिवारी विरोधकांच्या महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांसह सत्ताधारी भाजपकडून आपली दुसरी उमेदवारी यादी जाहीर करण्यात आली. मविआतील शिवसेना ठाकरे गटाने आपल्या दुसऱ्या यादीत 18, काँग्रेस पक्षाने 23, तर राष्ट्रवादी शरद पवार गटाने 22 उमेदवारांची आपली दुसरी यादी जाहीर केली.

सत्ताधारी भाजपनेही आपल्या दुसऱ्या यादीत 22 उमेदवारांचे तिकीट पक्के केले. राजकीय पक्षांकडून उमेदवारी याद्या जाहीर होताच अनेक नेत्यांकडून नाराजीचे फटाके फोडण्यास सुरुवात झाली आहे. इच्छुक असूनही तिकीट न मिळाल्याने जाहीरपणे नाराजी व्यक्त करीत अनेकांनी अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे, तर काहींनी तिकिटासाठी इतर पक्षांशीही संपर्क साधण्यास सुरुवात केल्याचे समजते.

**तेजस्विनी घोसाळकर यांना एबी फॉर्म**

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी शनिवारी शिवसेनेचे (उबाठा) दिवंगत माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी आणि आमदार विनोद घोसाळकर यांच्या स्नुषा तेजस्विनी घोसाळकर यांना विधानसभा निवडणुकीचा एबी फॉर्म दिला. ठाकरे गटाकडून तेजस्विनी घोसाळकर यांना दहिसरमधून उमेदवारी दिली जाणार आहे, मात्र निवडणूक लढवायची की नाही याचा निर्णय घोसाळकर कुटुंबाने घ्यायचा आहे, असे ठाकरे सेनेकडून स्पष्ट करण्यात आले.

## मी निवडणूक लढणार, लढणार आणि लढणारच...

*भाजपकडून राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांच्या उमेदवारीला विरोध करण्यात येत होता. त्यामुळे यावेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून नवाब मलिक यांना तिकीट न देता त्यांची मुलगी सना मलिक यांना अणुशक्तीनगरमधून तिकीट देण्यात आलं. मात्र नवाब मलिक हे अजूनही निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. नवाब मलिक हे शिवाजीनगर-मानखुर्द विधानसभेमधून अपक्ष किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. नवाब मलिका यांच्या या निर्णयामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान या सर्व पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी नवाब मलिक यांची भेट घेतली. यावेळी छगन भुजबळ यांना या भेटीबाबत विचारले असता त्यांनी हात जोडल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अजित पवार, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल आणि नवाब मलिक यांच्यामध्ये बंददाराआड चर्चा झाली. या बैठकीत नवाब मलिक यांना राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडून निवडणूक लढवू नका अशी विनंती करण्यात आली, पण तरी देखील नवाब मलिक हे निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत.*



## दोन्ही मलिकांची कोंडी

## आपण उपद्रवी असतो तर तिकीट मिळालं असतं...



***वाशीम:*** *तब्बल चारवेळा वाशीम विधानसभा मतदारसंघ भाजपच्या खाती जमा केलेले भाजपचे आमदार लखन मलिक यांची उमेदवारी पक्षाने कापल्याचे वृत्त समजताच आमदार लखन मलिक यांना अश्रू अनावर झाले, पक्षाने आपल्यावर अन्याय केल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आपल्या आमदारकीच्या चार टर्ममध्ये आपणं कोणताही भ्रष्टाचार केला नाही, कोणतीही संपत्ती जमा केली नाही, असे म्हणत आपण उपद्रवी असतो तर कदाचित तिकीट कापलं गेलं नसतं,अशी उद्वेगजनक भावना लखन मलिक यांनी व्यक्त केली. भाजपच्या दुसऱ्या यादीत आमदार लखन मलिक यांना डावलून पक्षाने शाम खोडे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.*

## रात्रीस खेळ चाले...

## जरांगे-उदय सामंतांची पुन्हा भेट

### राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

**प्रतिनिधी**
■ **जालना**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. राजकीय वर्तुळात अनेक घडामोडी घडत असून भेटीगाठी घेतल्या जात आहेत. याच पार्श्वभूमीवर आता उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुन्हा एकदा मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे.अंतरवाली सराटीत उदय सामंत यांनी मनोज जरांगे यांनी भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये 20 ते 25 मिनिटे चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, उदय सामंत यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे देखील उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीसाटी सर्व पक्षांच्या उमेदवारी याद्या जाहीर झाल्यानंतर आम्ही निर्णय घेणार आणि उमेदवार जाहीर करणार, असे मनोज जरांगे यांनी म्हटले होते. तसेच, उमेदवारांची चाचपणी देखील सुरू केली आहे, असेही मनोज जरांगे यांनी सांगितले होते. यानंतर उदय सामंत यांनी जरांगे यांची भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

## अनंत अंबानींनी घेतली फडणवीसांची भेट

### मध्यरात्री दोन तास चर्चा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

प्रसिद्ध उद्योजक मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी यांनी सध्या राजकीय नेत्यांच्या भेटीगाठींना सुरुवात केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. ऑक्टोबरच्या सुरुवातीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरेंची भेट त्यांनी घेतली होती. परंतू, विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत अनंत अंबानी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.



अनंत अंबानी हे शुक्रवारी मध्यरात्रीच देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. यावेळी दोघांमध्ये दोन तास चर्चा झाल्याचे समजते आहे. भेटीमागचे कारण समोर आलेले नसले तरी काही व्यावसायिक कारण किंवा एखादा कार्यक्रम निमंत्रण आदी असेल असे बोलले जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भेट झाल्याने या दृष्टीनेही याकडे पाहिले जात आहे.

अनंत अंबानी यांनी ऑक्टोबरच्या सुरुवातीला मातोश्रीवर जात उद्धव ठाकरेंची भेट घेतली होती. यावेळी तेजय ठाकरे देखील उपस्थित होते. तर यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती. यावेळी त्यांच्यासोबतही अंबानींनी दीड-दोन तास चर्चा केली होती.

## सुधीर मुनगंटीवार यांना धक्का...

## आ. जोरगेवारांचा भाजपमध्ये होणार प्रवेश

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राज्याचे वनमंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे नेते सुधीर मुनगंटीवार यांना भाजपने जोरदार धक्का दिला आहे. चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांना पक्षात प्रवेश घेण्यास त्यांचा प्रचंड विरोध होता. कालपर्यंत त्यांचा विरोध कायम होता. याकरिता दिल्लीलासुद्धा ते जाऊन आले, असे असतानाही पक्षाने जोरगेवार यांना पक्षात घेण्याचा निर्णय घेतला आहे. रविवारी मुनगंटीवार यांच्याच उपस्थितीत



ते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. हा मुनगंटीवार यांना शह मानला जात आहे.

आमदार जोरगेवार यांच्या भाजप प्रवेशाला राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वी वेळोवेळी विरोध दर्शवला होता. भाजपच्या कार्यकर्त्यांनी सतरंज्याच उचालायच्या का ? असा त्यांचा सवाल होता. त्यांची निष्ठाही तपासून बघावी अशी सूचनाही त्यांनी केली होती. असे असतानाही त्यांचा प्रवेश होत असल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. हा मुनगंटीवार यांना शह मानला जातो. जोरगेवार चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडून आले होते. मात्र, आता राजकीय परिस्थिती बदलली आहे. अपक्ष निवडून येण्याची शाश्वती नसल्याने त्यांनी भाजपमध्ये जाण्याच्या निर्णय घेतला आहे. पान 8 वर

'कोल्ड प्ले','दिलजीत कॉन्सर्ट' तिकीट काळाबाजार प्रकरण

## 'ईडी'चे देशभरात 13 ठिकाणी छापे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

'कोल्ड प्ले' आणि 'दिलजीत कॉन्सर्ट'च्या तिकीट काळाबाजारप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) दिल्ली, मुंबई, जयपूर, चंदीगड, बंगळुरू येथे छापे टाकले. 'ईडी'ने 13 ठिकाणी छापे टाकले असून तिकिटांच्या बेकायदा विक्रीसाठी समाज माध्यमांचा वापर करण्यात आल्याचे प्राथमिक तपासणीत निष्पन्न झाले आहे.

दिलजीत दोसांझचा 'डिल्युमिनाटी' आणि 'कोल्डप्ले'च्या 'म्युझिक ऑफ द स्पीअर्स वर्ल्ड टूर'चे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही कार्यक्रमांना चाहत्यांची प्रचंड गर्दी होण्याची शक्यता आहे. या कार्यक्रमांची अधिकृत तिकीट विक्री 'बुक माय शो' आणि 'झोमॅटो लाईव्ह'मार्फत करण्यात आली. पण काही मिनिटांतच तिकिटांची विक्री झाली. त्यानंतर या तिकीटांची काळ्या बाजारात चढ्या भावाने विक्री सुरू आहे. त्याच्या माध्यमातून देशभरात चाहत्यांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी आहेत. अनेक चाहत्यांना बनावट तिकीटे विकण्यात आली. वैध तिकिटांसाठी त्यांच्याकडून अधिक रक्कम घेण्यात आली.

देशभरातील विविध राज्यांमध्ये याप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. 'बुक माय शो'नेही याप्रकरणी मुंबई पोलिसांकडे काही संशयितांविरोधात तक्रार केली आहे.

पान 8 वर

लॉरेन्स बिश्नोईच्या तुरुंगातील मुलाखतीप्रकरणी

## दोन उपअधीक्षकांसह 7 पोलीस कर्मचारी निलंबित

**प्रतिनिधी**
■ **चंदीगढ**

गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई पोलीस कोठडीत असताना घेतलेल्या मुलाखतीच्या चौकशीनंतर पंजाब पोलिसांनी दोन उपअधीक्षक दर्जाच्या एकूण 7 पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केल्याचे वृत्त एका खासगी नियतकालिकानेने दिले आहे.



विशेष पोलीस महासंचालक (मानवाधिकार) यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथकाला (एसआयटी) आढळून आले की, लॉरेन्स बिश्नोई खरार, मोहाली येथे पंजाब पोलिसांच्या ताब्यात असताना एक मुलाखत घेण्यात आली आणि दुसरी मुलाखत राजस्थानमधील तुरुंगात असताना घेण्यात आली होती.

तपास पथकाच्या निष्कर्षांनंतर, पंजाबच्या गृहसचिवांनी शुक्रवारी (दि.२५) पोलीस उपअधीक्षक गुरशेर सिंग संधू, पोलीस उपधीक्षकांसह समर वनीत, उपनिरीक्षक रीना (सीआयए खरार), उपनिरीक्षक जगतपाल जंगू, उपनिरीक्षक शगनजीत सिंग, सहायक उपनिरीक्षक यांना निलंबित केल्याची घोषणा केली. इन्स्पेक्टर मुखतियार सिंग आणि हेड कॉन्स्टेबल ओम प्रकाश यांचा देखील निलंबनाच्या यादीत समावेश आहे. या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन वरील सर्व अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.


SIT च्या अहवालात स्पष्टपणे सूचित करण्यात आले आहे की, बिश्नोई यांची मुलाखत 3 आणि 4 सप्टेंबर 2022 च्या रात्री व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आली होती. मार्चच्या सुरुवातीला एका खासगी वृत्तवाहिनीने बिश्नोई यांच्या दोन मुलाखती प्रसारित केल्या होत्या, ही पहिली क्राइम इन्व्हेस्टिगेशन एजन्सी (CIA) च्या आवारातून होती. खररमधील कर्मचारी, मोहालीच्या एसएएस नगरच्या अखत्यारीतील आणि दुसरा जयपूर मध्यवर्ती कारागृहातील मुलाखती असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## "घाबरवण्यासाठी छापेमारी" पुन्हा टार्गेटवर फडणवीस

### देशमुखांनी लिहिलेल्या पुस्तकातील मुद्दे आले समोर

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

कथित 100 कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना अनेक महिने कारागृहात काढावे लागले होते. याकाळात अनिल देशमुख यांनी घडलेल्या घटनांवर आधारित एक पुस्तक लिहिलं. यात त्यांनी स्वतःचं आत्मचरित्र असल्याचा दावा केलाय. 'डायरी ऑफ होम मिनिस्टर' नावानं हे पुस्तक लिहिलं असून, लवकर पुस्तकाचं प्रकाशन होणार होते. मात्र, निवडणुकीची धामधूम असल्यानं पुस्तक येत्या दोन




ते तीन दिवसात बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. त्यातील काही पानं आज अनिल देशमुख यांनी सार्वजनिक केली आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर खोटे आरोप केले आणि वरच्या लोकांच्या मदतीनं ईडी व सीबीआय तपासाचा ससेमिरा लावून कारागृहात टाकलं, असा आरोप अनिल देशमुख यांनी पुन्हा केलाय. कारागृहात असताना त्यांनी 'डायरी ऑफ होम मिनिस्टर'नावाचं पुस्तक लिहिलंय. त्यात ते लिहितात की, "उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या विरोधात प्रतिज्ञापत्र द्यावं याकरिता फडणवीस यांचा दूत माझ्याकडं आला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या त्या दूताचं नाव सुमित कदम होतं." संपूर्ण घटना कशी घडली याबाबत मी या पुस्तकात एक्स्पोज केलं असल्याचं ते म्हणाले.

**...म्हणून माझ्या घरावर छापेमारी झाली :** "मी देवेंद्र फडणवीस यांच्या म्हणण्यानुसार वागलो नाही त्यामुळं दुसऱ्या दिवशीच माझ्या घरी ईडीची रेड झाली. उद्धव ठाकरेंचं सरकार पाडण्यासाठी गलिच्छ राजकारण फडणवीस यांनी केलं," असा उल्लेखही पुस्तकात करण्यात आलाय.

एखाद्या प्रकरणात तपास अधिकारी कोण असणार हे सीबीआयचा संचालक ठरवत असतो, केंद्रीय गृहमंत्री नाही. परमबीर सिंह यांनी याचिकेत माझ्यावर केलेल्या आरोपांवर सीबीआयनं विश्वास दाखवला होता, जेणेकरून तपास करता **पान 8 वर**

## जोगेश्वरीत 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या स्वयंसेवकांचे श्रमदान

**मुंबई:** जोगेश्वरी पूर्वेकडील एमएचबी कॉलनी-सर्वोदयनगरमध्ये शनिवारी 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या स्वयंसेवी संस्थेच्या स्वयंसेवकांनी श्रमदान केले. संस्थेच्या धारावी ग्रुपमधील तरुण-तरुणींनी स्वयंस्फूर्तीने एमएचबी कॉलनीतील उद्यानाची स्वच्छता केली. जीवनात सेवाभावी दृष्टिकोन ठेवला पाहिजे, निस्वार्थी भावनेने समाजाची सेवा केली पाहिजे हा श्री श्री रविशंकर यांनी दिलेला संदेश अंगीकारत आम्ही उपक्रमात सहभागी झालो, अशी भावना सहभागी तरुण-तरुणींनी व्यक्त केली. कॉलनीतील स्थानिक रहिवाशी प्रमोद खामकर, मंगेश मोरे, संजय सावंत आदींनी सहभागी तरुण तरुणींच्या उपक्रमाचे कौतुक केले.



## थोडक्यात

### दिवाळीच्या तोंडावर पोलीस अधिकारी अस्वस्थ

**वसई:** : विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने काढलेल्या परिपत्रकाचा फटका मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयातील सुमारे ४० वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना बसणार आहे. एका आयुक्तालयात दोन जिल्हे असल्यास ३ वर्षे पुर्ण झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्याचे निर्देश पोलीस महासंचालकांना दिले आहेत. या आदेशात देण्यात आले आहे. मात्र लोकसभा निवडणूकीपूर्वीच बदली झालेल्या अधिकाऱ्यांची बदली होणार असल्याने पोलीस दलात नाराजी पसरली आहे. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने नवीन परिपत्रक काढले आहे. आयुक्तालयात दोन जिल्हे असतील आणि ज्या पोलिसांनी मागील ४ वर्षात ३ वर्षे सेवा झाली असेल अशा पोलिसांची आयुक्तालयाबाहेर बदली करण्याचे निर्देश पोलीस महासंचलाकांना दिले आहेत. या आदेशामुळे मुंबई, नवी मुंबई आणि मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील अडीचशे पोलिसांना या निर्णयाचा फटका बसणार आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात ठाणे आणि पालघर असे दोन जिल्हे आहेत. त्यामुळे या आयुक्तालयातील तब्बल ४० पोलीस अधिकाऱ्यांचा बदल्या होणार आहेत. ऐन दिवाळीत बदली होणार असल्याने या निर्णयामुळे पोलीस अधिकाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

### मतदान केंद्रे, स्ट्राँग रूमचा आढावा

**मुंबई:** दहा हजारांपेक्षा जास्त मतदारसंख्या असलेली मतदान केंद्रे आणि दहिसर येथील मध्यवर्ती मतदान केंद्राच्या स्ट्राँग रूमची नुकतीच अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजित बांगर, निवडणूक निर्णय अधिकारी (दहिसर विधानसभा मतदारसंघ) शीतल देशमुख आणि नायब तहसीलदार बालाजी फोले यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी सुरळीत आणि सुरक्षित निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक तयारीचा आढावाही घेतला. .सुरक्षाव्यवस्था, प्रवेशयोग्यता आणि मतदान केंद्रांवर किमान सुविधा याबाबत आढावा घेतानाच ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमची सुरक्षेबाबतही तपासणी करण्यात आली. या वेळी अभिजित बांगर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना जास्त मतदारांच्या ठिकाणी गर्दी टाळण्यासाठी रांगांचे नियोजन याबाबत सूचना दिल्या. निवडणूक अधिकाऱ्यांना वृद्ध, अपंग आणि गर्भवती मतदारांना जलद प्रक्रियेसाठी प्राधान्य देण्याचा सल्ला देऊन आगामी निवडणुकांत पारदर्शकता आणि कार्यक्षमता राखण्यासाठी निवडणूक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याच्या सूचना बांगर यांनी दिल्या

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# पालघरमधील तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कंपनीत स्फोट, 3 कामगार गंभीर जखमी

प्रतिनिधी
■ पालघर

तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कंपनीत स्फोट झाल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. धार्मित रिसायकलिंग इंडस्ट्रीज या कंपनीत स्फोट होऊन आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कंपनीमधील स्फोट नेमक्या कोणत्या कारणामुळे झाला याबाबतची कोणत्याही प्रकारची माहिती समजली नाही. या दुर्घटनेत कंपनीतील तीन कामगार गंभीर जखमी झाले असून एक कामगार किरकोळ जखमी झाला आहे. उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट नंबर जी.44 स्थित कंपनीत स्फोट आग लागल्याची घटना घडली आहे. धार्मित रिसायकलिंग इंडस्ट्रीज या कंपनीत सकाळी अकरा वाजताच्या सुमारास अचानक स्फोट झाला. स्फोट होऊन कंपनीत आग लागली दरम्यान घटनेची माहिती मिळताच बोईसर पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. कंपनीला लागलेल्या या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न अग्निशमन दलामार्फत सुरू आहेत.

धार्मित रिसायकलिंग इंडस्ट्रीज या कंपनीत कॉपर सल्फेट बनवण्यात येते. कंपनीत उत्पादन सुरू असताना स्फोट प्राथमिक माहिती समोर आली आहे. उत्पादन सुरु असताना झालेल्या स्फोटात कंपनीतील तीन कामगार गंभीररीत्या जखमी झाले आहेत तर एक कामगार किरकोळ जखमी झाला आहे. दुर्घटनेत जखमी झालेल्या जखमी कामगारांना बोईसर येथील तुंगा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून सध्या जखमींवर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, कंपनी मालकांना चौकशीसाठी पोलिसांना बोलावून घेतल्याची माहिती समजत आहे. त्यामुळे कंपनी हवी ता सुरक्षेची यंत्रणा वापरण्यात आली होती का याची चौकशी केली जाऊ शकते. सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेतली गेली नसेल तर कंपनी मालकांसाठी अडचणीचं ठरणार आहे.

# टीबी लसीकरण लटकले

- आरोग्य कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा परिणाम
- मुंबईतील १० लाख नागरिकांचे होणार लसीकरण

प्रतिनिधी
■ मुंबई

क्षयरोगावर मात करण्यासाठी बीसीजी लसीकरण केले जात आहे. ही लसीकरण चाचणी यशस्वी झाल्यास टीबीमुक्त भारताची मोहीम लवकरच पूर्ण होईल. याअंतर्गत सप्टेंबरपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये क्षयरोगविरोधी लसीची चाचणी सुरू झाली आहे. मुंबई वगळता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत १२ लाखांहून अधिक जणांना टीबी प्रतिबंधक लसीचा डोस देण्यात आला आहे; मात्र मुंबईत अजूनही या लसीकरणाला सुरुवात झालेली नाही.त्यासाठी मुंबईकरांना आणखी काही वेळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. राज्यात मुंबई वगळता ३ सप्टेंबरपासून या लसीची चाचणी सुरू करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ पर्यंत देश टीबीमुक्त करण्याचे आवाहन केले आहे.

या आवाहनांतर्गत राज्यासह संपूर्ण देशात क्षयरोगाच्या विरोधात व्यापक मोहीम राबवण्यात येत आहे. क्षयरोग टाळण्यासाठी १८ वर्षांवरील प्रौढांसाठी टीबीविरोधी बीसीजी लस देण्यात येणार आहे. राज्य क्षयरोग निर्मूलन अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत मुंबई वगळता इतर क्षयरोग जिल्ह्यातील १२ लाख ३० हजार ३६२ लोकांवर या लसीची चाचणी करण्यात आली आहे. या उपक्रमाला राज्यात चांगला पाठिंबा मिळत आहे.

## तोरंगण घाटात मद्य वाहतुकीचा ट्रक उलटला

प्रतिनिधी
■ मोखाडा

तालुक्यातील तोरंगण घाट जेवढा निसर्गरम्य मनमोहक आहे, तेवढाच जीवघेणाही आहे.हा घाट रस्ता त्र्यंबकेश्वरच्या आंबोलीपासून वालब्रिज पुलापर्यंत तीव्र उताराचा आणि नागमोडी वळणे असलेला आहे. वाहनाचे ब्रेक फेल होऊन अपघात होण्याचे प्रसंग नेहमी घडत असतात.अशातच शुक्रवारी सकाळी औरंगाबाद येथून गुजरातच्या दिशेने मद्य (एल.पी बिअर) घेऊन जाणाऱ्या चट्रकचा तोरंगण घाटात अपघात झाला. यात वाहनातील मालाचे आणि वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

एमआयडीसी नाशिक ते तारापूर म्हणा किंवा नाशिक ते गुजरात,पालघर,डहाणू अशा मालवाहतूक वाहनांची मोठी रेलचेल दररोजची असते.मात्र घाट रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या वाहनांचे चालक हे नवीन असतात किंवा आंबोली पासून वाहन चालक गाडीचे ब्रेक लावत येतात. त्यामुळे तोरंगण घाटात पोहचेपर्यंत गाडीचे ऑईल ब्रेक गरम होऊन फेल होतात आणि नेमका जिथे अपघात घडण्याचे ठिकाण आहे त्या ठिकाणी तीव्र उतार असल्याने गाडीचे ब्रेक लागत नाहीत आणि अपघात घडत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.याच पध्दतीने शुक्रवारी सकाळी औरंगाबाद येथून गुजरातकडे जाणाऱ्या गाडीचा अपघात झाला असल्याचे समोर आले आहे.सुदैवाने अपघात झाल्यानंतर कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र वाहनांचे आणि वाहनातील मालाचे प्रचंड नुकसान झाले आहे.

# मुरबे सातपाटी खाडीत हजारो मासे मृतावस्थेत

## प्रदूषित पाण्यामुळे घटना घडल्याचे मच्छीमारांचे आरोप

प्रतिनिधी
■ पालघर

पालघर तालुक्यातील सातपाटी व मुरबे दरम्यान असणाऱ्या खाडीमध्ये आज सकाळी हजारोंच्या संख्येने मासेमृत पडल्याची घटना समोर आली आहे. प्रदूषित पाण्यामुळे मासे मृत पावल्याची शक्यता वर्तविण्यात येत असून मच्छीमार समुदायाने या घटनेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आज सकाळी साडेनऊ दहाच्या सुमारास मुरबे खाडी मधील पाण्यावर बोई प्रजातीचे मासे मृत होऊन पाण्यावर तरंगत असल्याचे निदर्शनास आले. काही वेळानंतर पाण्यावर तरंगणाऱ्या मृत माशांची संख्या वाढून ती हजारोच्या संख्येत गेली. तरंगणारे मासे पाहण्यासाठी गावकरी



समुद्रकिनारी पोहोचले व त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात यासंदर्भात तक्रार नोंदवली.प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्याने घटनास्थळी येऊन मृत मासे व खाडीतील पाण्याचे नमुने गोळा केले असून ते तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. दरम्यान वेगवेगळ्या आकाराचे व इतर प्रजातींचे मासे देखील मृत पावले असून प्रदूषित पाणी हे त्यामागील प्रमुख कारण असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

तारापूर औद्योगिक वसाहती मध्ये निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून हे सांडपाणी खोल समुद्रात सात किलोमीटर अंतरावर सोडण्याची प्रक्रिया काही दिवसांपासून राबवण्यात येत आहे. तरीदेखील तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये वेगवेगळया चेंबर मधून ओव्हरफ्लो होणारे पाणी नाल्यांच्या मार्गे खाडीत पोहचत असून लांबलेल्या पावसाच्या पाण्यासोबत प्रदूषित व रासायनिक घटक असणारे सांडपाणी खाडीमध्ये मिसळले असल्याची शक्यता आहे.

तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये निर्मित होणाऱ्या सांडपाण्यांपैकी सहजगत प्रक्रिया करू न शकणारे सांडपाणी टँकर मधून गोळा करून ते पाणी विशेष सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पाठवण्यात येते. मात्र असे अति प्रदूषित असणारे सांडपाणी गोळा करून त्याची वाहतूक करणारे टँकर व्यवसायिक राजकीय पार्श्वभूमीची असून काही टँकर चालक असे अति प्रदूषित पाणी जवळच्या नदी नाल्यामध्ये सोडत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. असा एखादा प्रकार काल रात्री किंवा आज पहाटे घडल्याने खाडी मधील मासे मेल्याची शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे.

या खाडीच्या जवळपास एक कोलंबी प्रकल्पापासून त्या ठिकाणी असणाऱ्या पॉन्ड ची साफसफाई करताना पेस्टिसाइड युक्त पाणी खाडीत सोडल्याने ही घटना घडण्याची शक्यता देखील वर्तवण्यात येते आहे.

# अखिल वीरशैव लिंगायत महासंघाची विधानसभा निवडणुकीत 36 उमेदवार देण्याची मागणी

- सर्व पक्षांनी उमेदवारी न दिल्यास नोटाचां पर्याय उपलब्ध
- राजकीय पक्षांना इशारा

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून सर्वच राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे केलेली असताना अनेक ठिकाणी उमेदवारी न मिळाल्याने नाराजीचे सुर सुध्दा उमटताना दिसत आहेत. अशात बंडखोर उभे होत आहेत तर दुसरीकडे विविध समजाकडून समाज विकासाच्या मुद्द्यावर सर्वच राजकीय पक्षांकडे समाजाच्या प्रतिनिधीला उमेदवारी मिळावी म्हणून प्रयत्न केले जात आहेत.

अखिल वीरशैव लिंगायत महासंघाने चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व प्रवक्ता डॉ विजय जंगम ( स्वामी ) यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद घेत राज्यातील विधानसभा निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांकडे समाजातील उमेदवारांना उमेदवारी देण्याची मागणी केल्याचे जंगम म्हणाले. त्यांनी समाजाच्या ३६ प्रतिनिधीना उमेदवारी मिळावी अशी मागणी केली आहे. ज्या राजकीय पक्षाकडून समाजाला उमेदवारी न दिल्यास आम्हाला त्याठिकाणी नोटांचा पर्याय उपलब्ध राहील असा इशारा देखील यावेळी डॉ विजय जंगम ( स्वामी ) यांनी दिला आहे.



महासंघाच्या मागणीचा विचार करून महाराष्ट्र नवनिर्माण सेना , शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गट, भारतीय जनता पार्टी आणि जनसुराज्य पक्ष या पक्षाकडून वीरशैव लिंगायत समाजातील उमेदवार दिले आहेत त्याठिकाणी समाजाची मत त्यांना मिळणार आणि ज्या राजकीय पक्षांनी लिंगायत समाजाचे उमेदवार दिले नाहीत त्यांना समाजाची मत देऊ नका असे सूचित करण्यात आले असून अशा मतदार संघात अखिल वीरशैव लिंगायत महासंघ महाराष्ट्रातील तमाम वीरशैव लिंगायत समाजाला कोणत्याही उमेदवाराला मत न देता नोटा पर्याय निवडण्यासाठी आवाहन करणार असल्याचे डॉ विजय जंगम ( स्वामी ) यांनी पत्रकार परिषदेत केले. राज्यातील ३६ मतदार संघात लिंगायत समाजाची निर्णायक मत असून आम्ही ही शक्ती समाजाच्या विकास कामासाठी समाजाचे उमेदवार देण्याची मागणी करत आहोत. आजवर लिंगायत समाजाचा ओट बँक म्हणून वापर झाला आहे आता तसे होणार नाही आता समाजाला ही हिस्सा हवा आहे समाजाचे हित जोपासणे ह्या मागचा उद्देश आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्रात लिंगायत मत निर्णायक आहेत त्यामुळे आमच्या मागणीला दुर्लक्ष करून चालणार नाही.

# आदिवासी पाड्यावर आदिवासींची दिवाळी साजरी

## मोहिते महाविद्यालयाची सामाजिक बांधिलकीची

प्रतिनिधी
■ मोखाडा

दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली असून मुंबई व मुंबई उपनगरातील सामाजिक संस्था सामाजिक बांधिलकी जपत आदिवासींची दिवाळी गोड करतात. खोडाळयातीळ मोहिते महाविद्यालय आणि मुंबई येथील श्रीनिवास सावरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली नुलकर आणि परिवार सहविचारी सहकाऱ्यांच्या माध्यमातून मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या दत्तक गाव कोचाळे येथे आदिवासी बांधवांची गोड खाऊ, कपडे आणि शैक्षणिक साहित्य वाटप करत आदिवासींची दिवाळी गोड केली.



दिवाळी म्हणजे दिव्यांचा झगमगाट, फराळाचा आस्वाद अन् फटाक्यांची आतिषबाजी हे नेहमी दिसणारे चित्र असले तरी, शहरी भागापासून दूर ग्रामीण भागातील आदिवासी वाड्यावस्तींवर, कसे तरी उभ्या असलेल्या कुडाच्या झोपडीतील आदिवासींचे चित्र म्हणजे अगदी त्याउलट. तिथे दिवाळी सण असो अथवा इतर कुठलाही सण म्हणजे एकप्रकारे अनेक कोस दूरचे अंतर. अशा या आदिवासी दिनदुबळयांच्या जीवनात एकप्रकारे दिपावलीची पणती पेटवण्याचे काम नूलकर आणि परिवार गेल्या सहा वर्षांपासून करत आहे.

यंदाच्या दीपावलीतही 'एक करंजी मोलाची' व 'एक वस्त्र मोलाचे' हे उपक्रम राबवून बृहन्मुंबई महानगरपालिकेतील निवृत्त कर्मचारी आणि मोहिते महाविद्यालय खोडाळा जोगलवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दत्तक गाव कोचाळे येथे १२० आदिवासी, गरजू कुटुंबाना दिवाळी व भाऊबीजेनिमित्त फराळाचे व मिठाई वाटप करण्यात आली. तसेच ७०-८० महिलांना भाऊबीजेच्या औचित्य साधून पातळ व साड्यांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीने दिवाळी गोड करण्याचा उपक्रम मोहिते महाविद्यालयाकडून राबविण्यात आला.




**वसई ।** या दिवाळीत तुमचे सेलिब्रेशन दुप्पट करा... OPPO चे जागतिक दर्जाचे मोबाईल खरेदी करा आणि रु.१० लाख व इतर आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळवा! नालासोपारा येथील ए.एम. कॉर्पोरेशनमधून OPPO फोन खरेदी करून सलीम मिराशी रु.१० लाखांचे भाग्यवान विजेते ठरले आहेत.

# राजकारणात व्यक्तिगत टीका करणे योग्य नाही!

## भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांचे मत

प्रतिनिधी
■ मुंबई

वसंत देशमुख यांनी जयश्री थोरात यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याविरोधात भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी नापसंती व्यक्त करत राजकारणात राजकारण राजकारणासारखे झाले पाहिजे. महिलेवर किंवा कुणावरही व्यक्तिगत पातळीवर अशा प्रकारची टीका करणे योग्य नाही, असे मत व्यक्त केले आहे.

माध्यमांशी बोलताना दरेकर म्हणाले की, वसंत देशमुख यांनी केलेले वक्तव्यच चुकीचे आहे. एखाद्या महिलेसंदर्भात अशा प्रकारची भाषा वापरणे हे महाराष्ट्राच्या, मराठी संस्कृतीला शोभा देणारे नाही. याबाबत स्वतः सुजय विखे पाटील यांनीही हे विधान चुकीचे असल्याची भुमिका घेतलीय. हे वक्तव्य गैर असल्याबाबत कुणाचे दुमत नाही. पण त्या आडून कुणीही आपले राजकारण साधू नये.

तसेच सुजय विखे यांच्या संशयाच्या दृष्टीने पोलीसही तपास करून चौकशी करतील. परंतू राजकारण गाड्या जाळणे, हत्या करणे इथपर्यंत टोकाला जाणे हे महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकारणाला योग्य नाही. निवडणुकीवेळी अशा प्रकारे वादंग निर्माण होणे, वितुष्ट टोकाला जाणे हे योग्य नाही. त्याचा समाज मनावर, निवडणुकीवर विपरीत परिणाम होतो. हे कुठेतरी थांबायला हवे, असेही दरेकर म्हणाले.

राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे माहीम येथून निवडणूक लढविणार आहेत. त्यावर बोलताना दरेकर म्हणाले की, लोकशाहीत निवडणुकीच्या राजकारणात येऊन विधिमंडळात जाऊन राजकारण करणे या अमित ठाकरेंनी घेतलेल्या भूमिकेचे स्वागतच आहे. अमित ठाकरे लवकरच प्रगल्भ अशा प्रकारचे राजकीय नेतृत्व झालेले आहे. त्यांचा भविष्यकाळ निश्चितच उज्वल आहे. राज ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरेंनी निवडणुकीत राजकारण केले नाही. तथापी विकास करायचा असेल, समाजाला दिशा द्यायची असेल तर लोकशाही प्रक्रियेतून निवडणुकीच्या राजकारणातून विधिमंडळात जाणे लोकशाहीसाठी कौतुकास्पद, गौरवास्पद आहे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 127
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - १२७
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## डाबर रिअलच्या दिवाळी गिफ्ट पॅकची श्रेणी लाँच

**मुंबई :** डाबरइंडिया लिमिटेडचा भारतातील आघाडीचा ज्यूस आणि नेक्टर ब्रँड डाबर रिअलने 'रिअल दिवाळीग्रीटिंग्ज गिफ्ट पॅक'ची विस्तृत श्रेणी लॉन्च केली आहे. तुमच्या प्रियजनांसोबत फळांच्यागुणांनी समृद्ध 'आरोग्यदायी सणाच्या शुभेच्छा' शेअर करण्यासाठी रिअलचे हे बजेट-फ्रेंडलीस्पेशल गिफ्ट पॅक १०० ते ५५० रुपयांच्या रेंजमध्ये उपलब्ध आहेत. डाबर इंडिया लिमिटेडचेउपाध्यक्ष-विपणन श्री मयंक कुमार म्हणाले, "दिवाळीहा वर्षातील सर्वात मोठा सण आहे, प्रत्येकाला हा सण आपल्या कुटुंबासह आणि मित्रांसोबतसाजरा करायचा आहे. यानिमित्त भेटवस्तूंची देवाणघेवाण ही दिवाळीची सर्वात खास परंपराआहे. या दिवाळीत तुमच्या प्रियजनांना आरोग्यदायी भेटवस्तू देण्यास मदत करण्यासाठी आम्हीतुमच्यासाठी रिअल फ्रूट बेव्हरेजेसमधील फेस्टिव्हल गिफ्ट पॅकची खास रेंज आणत आहोत,ज्यामध्ये खास डिझाइन केलेले १९ रिअल ग्रीटिंग्ज गिफ्ट पॅक समाविष्ट आहेत. वास्तविकफळांच्या गुणांनी समृद्ध, रिअल ग्रीटिंग्ज गिफ्ट पॅकची श्रेणी चव आणि पौष्टिक फायदेप्रदान करेल. त्यामुळे या सणासुदीच्या मोसमात तुमच्या प्रियजनांना आमच्या विविध गिफ्टपॅकसह उत्तम आरोग्याची भेट द्या. आम्हाला खात्री आहे की ग्राहकांना हे गिफ्ट पॅक आवडतीलआणि निरोगी भेटवस्तू देऊन ते दिवाळी साजरी करतील.





# भाजपच्या 40 स्टार प्रचाकांची यादी जाहीर

## मोदी, शहा, योगी यांच्यासह नवनीत राणा यांच्या नावाचाही समावेश

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने 40 स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबरच नवनीत राणा यांच्या नावाचा देखील समावेश करण्यात आला आहे. या यादीमध्ये दोन महिलांचा देखील समावेश करण्यात आला आहे. यात नवनीत राणा यांच्याबरोबरच स्मृती इराणी आणि पंकजा मुंडे यांना देखील स्थान देण्यात आले आहे.









भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्टार प्रकारांच्या यादीमध्ये पक्षाचे प्रमुख नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग, अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासोबतच भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसेच राज्यातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे, नारायण राणे, पियुष गोयल, अशोक चव्हाण, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रविंद्र चव्हाण यांचा देखील समावेश केला आहे. याचबरोबर नव्याने केंद्रत मंत्री झालेले मुरलीधर मोहोळ यांना देखील या यादीमध्ये स्थान देण्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने नवनीत राणा यांना अमरावती मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. मात्र, त्यांचा पराभव झाला. नवनीत राणा या हैदराबाद येथे देखील भाजपचा प्रचार करण्यासाठी पोहोचल्या होत्या. आता महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत देखील नवनीत राणा या भारतीय जनता पक्षाच्या स्टार प्रचारक असतील. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान नवनीत राणा यांनी केलेल्या मुस्लिम समाजाबद्दलच्या वक्तव्यामुळे चांगलाच वाद निर्माण झाला होता. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीत देखील नवनीत राणा यांच्या वक्तव्यांकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

# लोकसेवा आयोगाने सात सहाय्यक आयुक्तांची शिफारस यादी जाहीर

## अवमान याचिका दाखल केल्यानंतर आयोगाची सावध भूमिका

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेला लवकरच सात सहाय्यक आयुक्त मिळणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अखेर सात सहाय्यक आयुक्तांची शिफारस यादी आपल्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे. सहाय्यक आयुक्तांची सात पदे भरण्यासाठी उमेदवारांची यादी द्यावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस यादी न दिल्यामुळे मुंबई महानगरपालिकेने नुकतीच आयोगाविरोधात अवमान याचिका दाखल केली होती. त्यानंतर आयोगाने सावध पवित्रा घेत सात उमेदवारांची यादी जाहीर केली. या सात उमेदवारांमध्ये एका महिलेचा समावेश आहे.



मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांची नियुक्ती लोकसेवा आयोगामार्फत केली जाते. या पदावर बढतीने नियुक्ती दिली जात नाही. जून २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदाच्या १६ जागांसाठी जाहिरात दिली होती. त्यानंतर उमेदवारांची चाचणी परीक्षा, लेखी परीक्षेचा निकाल, कागदपत्रांची पडताळणी, मुलाखती अशी सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली होती. मात्र कागद पडताळणीनंतर अपात्र उमेदवारांनी या भरती प्रक्रियेतील नऊ उमेदवारांविरोधात याचिका दाखल केल्या होत्या. त्यामुळे ही भरती प्रक्रिया न्यायप्रविष्ट होती. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२४ मध्ये सात उमेदवारांची शिफारस यादी पालिकेला देण्याचे आदेश दिले होते.

# कडूंना धक्का; 'प्रहार'चे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांचा भाजपमध्ये प्रवेश

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. शनिवार, २६ ऑक्टोबर रोजी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश पार पडला. तसेच भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी त्यांची नियूक्ती करण्यात आली आहे.



यावेळी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "अनिल गावंडे यांनी केलेले सामाजिक काम बघून भाजप नेते संजय कुटे यांनी त्यांना पक्षप्रवेश देण्याचा निर्णय घेतला. अनिल गावंडेंच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा राहिल आणि पुढच्या काळात त्यांचे नेतृत्व समाजाला न्याय मिळवून देईल. त्यांच्या नेतृत्वात पश्चिम विदर्भातील अकोला जिल्ह्यात पक्षाचे काम उभे राहिल. इथले सोयाबिन, कापूस आणि इतर सर्व प्रश्न अनिल गावंडे पुढे नेतील आणि एक सामाजिक चळवळ उभी करतील. अनिल गावंडे यांच्या पक्षप्रवेशामुळे एक मोठा वर्ग पक्षाला मजबूत बनवण्यासाठी सामील झाला आहे. ते केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व योजना आणि विकासकामे पुढे नेतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"जयश्री थोरात माझ्या मुलीप्रमाणे आहेत. त्या आमच्या परिवारातील घटक आहेत. त्यांच्याबद्दल बोलल्यामुळे वसंतराव देशमुख यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. ते जिथे असतील तिथून त्यांना ताब्यात घ्यायला हवे. जयश्रीताईंचा अपमान सहन केला जाणार नाही. त्यामुळे वसंतराव देशमुख यांच्या वक्तव्याचा मी निषेध करतो. या घटनेचा गैरफायदा घेऊन विरोधी पक्षांनी सुजय विखे यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात जे दोषी आहेत त्यांनासुद्धा शिक्षा व्हायला हवी," अशीही मागणी बावनकुळेंनी केली आहे.

# चेंबूरच्या बिअर शॉपीमध्ये विदेशी मद्य विक्री

## नागरिकांकडून राज्य उत्पादन शुल्काकडे कारवाईची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई


बेकायदेशीर मद्य विक्री करणाऱ्या दुकानावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची सतत कारवाई होत असते मात्र तरीही अनेक दुकानात अशा पद्धतीने बेकायदेशीर मद्य विक्री करण्याचा प्रकार समोर येत आहेत. चेंबूरच्या विविध बिअर शॉपीमध्ये परवानगी नसताना चक्क विदेशी मद्य विक्री केली जात आहे. सध्या आचारसंहिता सुरू असताना देखील या बिअर शॉपीमधून ऑनलाईन विदेश मद्य ग्राहकांना घरपोच पोहचवली जात असल्याचा तक्रारी नागरिक करत आहेत.

चेंबूरच्या मैत्रीपार्क, घाटला गाव, खारदेवनगरच्या मुक्तीनगर येथे बिअर शॉपी असून या शॉपीमधून बिनधास्तपणे विदेशी मद्य विक्री केले जात आहे. नियमानुसार ग्राहकांजवळील परमिट तपासून मद्य दिले जाते मात्र या बिअर शॉपीमधील आस्थापनाधारक त्याची पडताळणी न करता विना परवाना मद्य विक्री करत आहेत. विशेष म्हणजे शॉपीच्या बाहेर ग्राहक बिनधास्तपणे मद्यपान करत आहेत. त्याचा मनस्ताप सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. या आस्थापनाधारकांना ऑनलाईन पद्धतीने घरपोच मद्य पुरवठा करण्याची कोणतीही परवानगी नसताना या सुविधा ते ग्राहकांना देत आहेत. अशाप्रकारे सदर आस्थापनाधारक शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवत आहेत. जे डिव्हिजनच्या निरीक्षकांनी याबाबत लक्ष घालून कारवाईची मागणी नागरिक करत आहेत.

# महिला तिकीट तपासनीसाने एकाच दिवसात पकडले 103 विनातिकीट प्रवासी

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेवरील विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची तिकीट तपासनीस धरपकड करीत आहेत. विनातिकीट प्रवाशांची धरपकड करण्यात महिला तिकीट तपासनीस आघाडीवर आहेत. मध्य रेल्वेच्या तेजस्विनी विशेष पथकाच्या मुख्य तिकीट परीक्षक सुधा द्विवेदी यांनी एकाच दिवसात १०३ विनातिकीट प्रवाशांची धरपकड करून दंड वसूल केला.



मध्य रेल्वेवरून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. या प्रवाशांच्या गर्दीत अनेक जण विनातिकीट प्रवास करतात. विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आळा घालण्यासाठी मध्य रेल्वेच्या सर्व विभागांमधील लोकल, मेल-एक्स्प्रेस, फलाटावर तिकीट तपासनीसांचे पथक तैनात करण्यात आले आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातर्फे अलिकडेच विविध स्थानकांवर 'नव दुर्गा' पथकामार्फत विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. तिकीट तपासणी मोहिमेला बळकटी देणे, सणासुदीच्या काळात योग्य आणि वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याबाबत जनजागृती करणे हा मुंबई विभागाच्या सर्व महिला विशेष तिकीट तपासनीसांच्या तेजस्विनी पथकाने राबविलेल्या या उपक्रमामागील उद्देश होता. यावेळी तेजस्विनी विशेष पथकाने अनियमित किंवा विनातिकीट प्रवासाची ३१८ प्रकरणे नोंदवली. या मोहिमेत एकूण ९६ हजार २४० रुपये दंड वसूल करण्यात आला. तर, तेजस्विनी विशेष पथकातील कर्मचाऱ्याने सरासरी ३५ विनातिकीट प्रकरणे हाताळून प्रति कर्मचारी १० हजार ६९३ रुपये दंड वसूल केला. तर, मुख्य तिकीट परीक्षक सुधा द्विवेदी यांनी एका दिवसात १०३ विनातिकीट प्रवाशांना पकडून विशेष कामगिरी केली.

# गोवंडीतील नाल्यात सापडला दीड वर्षाच्या मुलीचा मृतदेह

प्रतिनिधी
■ मुंबई

गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरात पालकांसोबत राहणारी दीड वर्षांची मुलगी शुक्रवारी सायंकाळी अचानक गायब झाली. शिवाजी नगर पोलिसांनी या मुलीचा शोध सुरू केला. शोध मोहिमेदरम्यान शनिवारी सकाळी या मुलीचा मृतदेह एका नाल्यात सापडला. दरम्यान, तिच्या मृत्यूचे नेमके कारण समजू शकलेले नाही. शिवाजी नगर पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.




गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरातील प्लॉट नंबर ५ येथे ही मुलगी पालकांसोबत राहत होती. ही मुलगी शुक्रवारी सायंकाळी परिसरात खेळत असताना अचानक गायब झाली. बराच वेळ झाला तरी ती घरी न परतल्याने पालकांनी तिचा शोध घेतला. मात्र ती सापडली नाही. अखेर पालकांनी शुक्रवारी रात्री उशिरा शिवाजी नगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन मुलगी हरवल्याची तक्रार दाखल केली.

पोलिसांनी या मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली. नाल्यामध्ये लहान मुलीचा मृतदेह असल्याची माहिती मिळताच शिवाजी नगर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने मुलीचा मृतदेह नाल्यातून बाहेर काढण्यात आला. हा मृतदेह याच मुलीचा असल्याचे उघड झाले. मुलीच्या अंगावरील जखमांवरून तिची अज्ञात व्यक्तीने हत्या केली असावी, असा पोलिसांना संशय आहे. याप्रकरणी शिवाजी नगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून शवविच्छेदनाच्या अहवालानंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले.

# म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी टी. व्ही शहा, कार्याध्यक्षपदी नवनाथराव पाटील व रमेश देशमुख यांची निवड

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांची सर्वात मोठी संघटना असलेल्या 'म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई'ची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २३ रोजी संघटनेच्या 'बाळ दंडवते स्मृती' सभागृहात पार पडली.या सभेमध्ये संघटनेच्या कामकाजाचा व ताळेबंदाचा आढावा घेण्यात आला.



तसेच, संघटनेच्या भविष्यकालीन वाटचालीची दिशा निश्चित करण्यात आली. त्याचबरोबर, या सभेमध्ये विविध पदाधिकाऱ्यांची निवडी देखील करण्यात आल्या. संघटनेच्या अध्यक्षपदी माजी जल-अभियंता टी. व्ही शहा यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी नवनाथराव घाडगे-पाटील यांची फेरनिवड तर रमेश भुतेकर-देशमुख यांची कार्याध्यक्षपदी नव्याने निवड केली गेली.कामगार नेते शरद राव यांचे दिर्घकालीन ज्येष्ठ सहकारी ऍड. महाबळ शेट्टी यांची सरचिटणीस पदी तर शरद राघव यांची कोषाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. दिपक चौगुले यांची सहाय्यक सरचिटणीस पदी नेमणूक केली गेली. तसेच अशोक जाधव यांची सन्माननीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.संघटनेच्या उपाध्यक्षपदी राजेंद्र जोशी, जीवन पाटील, जयंत खराडे यांची फेरनिवड तर, विशाल कोकाटे, जगन्नाथ गव्हाणे, संजीवन पवार व अमल मोहीते यांची नव्याने निवड करण्यात आली. संघटनेच्या सेक्रेटरी पदाची जबाबदारी सर्व किरण जकापुरे, सचिन मगरे, राकेश जोशी, सचिन गायकवाड व श्रीकांत पाटील यांना देण्यात आली आहे.संघटना आणखी बळकट करण्यासाठी संघटकपदी सर्व राहुल कोल्हे, शाम भारती, आशिष तांबाळे, रोहीत गलांडे, मनिष चवरे व स्वप्नील पाटील यांना निवडण्यात आले आहे. संघटनेच्या माजी पदाधिकाऱ्यांनी आजवर दिलेल्या योगदानाबद्दल उपस्थित सर्वांनी आभार व्यक्त केले.

सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवडी खेळीमेळीच्या वातावरणात सर्वानुमते करण्यात आल्या. नव्या कार्यकारिणीच्या निवडीसाठी मोठ्या संख्येने महानगरपालिका अभियंते उपस्थित होते. त्याबद्दल जीवन पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. नव्या कार्यकारिणीमध्ये अनुभवी पदाधिकाऱ्यांसह नव्या दमाच्या अभियंत्यांना संधी देण्यात आली असून त्यांच्याकडून भरीव कार्य घडावे याकरीता सर्व अभियंत्यानी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# यामिनी यशवंत जाधव 28 रोजी भरणार उमेदवारी अर्ज

प्रतिनिधी
■ मुंबई

भायखळयाच्या लोकप्रिय आमदार आणि भायखळा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना महायुतीच्या उमेदवार सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वा. आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.



अंजीरवाडी येथील गणेश मंदिरात गणेश दर्शन घेऊन त्या मस्करेन्हस रोड तसेच शेठ मोतीशा लेन येथून भायखळा रिचर्डसन क्रुडास येथे आपला अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करतील. शिवसेना+भाजपा+राष्ट्रवादी आणि रिपाईचे महिला-पुरुष कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. जल्लोषी मिरवणुकीने यामिनी जाधव यांचा अर्ज सादर केला जाणार आहे. अर्ज दाखल करण्यासाठी आणि यामिनी यशवंत जाधव यांना आपले बहुमोल आशीर्वाद देण्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन विभागप्रमुख तथा शिवसेना उपनेते यशवंत जाधव तसेच महायुतीच्या भायखळयातील पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सिद्दीकी हत्याकांडात बिष्णोई गँगचा हात असल्याचा पुरावा पोलिसांच्या हाती

## भाऊ अनमोलवर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल होण्याची शक्यता

प्रतिनिधी
■ मुंबई

माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या सुजीत सुशील सिंह याला पंजाबमधून अटक करण्यात आली होती. सिंह कुख्यात लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोलच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे याप्रकरणी अनमोल बिष्णोईला आरोपी करण्यात आले आहे. अनमोल बिष्णोईने यापूर्वी अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार घडवून आणला होता. सिंहच्या सांगण्यावरून याप्रकरणातील अटक आरोपी नितीन सप्रे व राम कनोजिया यांनी बाबा सिद्दिकी यांचे घर व आमदार झिशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाची पाहणी केली होती.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने ३२ वर्षीय सुजीत सिंह याला अटक केली आहे. त्याने परदेशातील गुंडासोबत संपर्क साधला होता. सिंह विविध समाज माध्यमातून अनेक खात्यांवर संवाद साधत होता. तो परदेशातील गुंड अनमोल बिष्णोई असल्याचा संशय आहे. सुजीत सिंह मुंबईतील रहिवासी आहे आणि बाबा सिद्दिकीच्या हत्या प्रकरणात त्याचा शोध सुरू होता. पंजाब पोलीस व मुंबई पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत सिंहला लुधियानातून पकडण्यात आले होते. सिंह बाबा सिद्दिकीला मारण्याच्या कटात सहभागी होता. तो पूर्वी घाटकोपरच्या छेडा नगर परिसरात राहात होता आणि त्याला लुधियानामध्ये अटक करण्यात आली.

याप्रकरणी आतापर्यंत पाच पिस्तुल जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांच्या मते, सिंहला बाबा सिद्दिकीची हत्या करण्याच्या कटाची माहिती होती आणि तो अनमोल बिश्नोईच्या संपर्कात होता. त्याने इतर आरोपींना पैसे पुरवले आणि शस्त्रांचा पुरवठा करण्यात सहभागी होता. गुन्हा घडण्याच्या आधी एक महिना सिंहने मुंबई सोडली होती.

सिंह बब्बू म्हणून प्रचलित आहे. तसेच तो या प्रकरणातील आरोपी मोहम्मद झिशान अख्तर याच्याशी संपर्क साधत होता. त्यानंतर तो चार ते पाच महिन्यांपूर्वी सप्रे आणि इतर आरोपींशी संपर्कात आला. सिंह विरोधात यापूर्वी एकही गुन्हा दाखल नाही. पोलीस त्याबाबत पडताळणी करीत आहेत. याप्रकरणी सिंहला ४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच हरिशकुमार निषाद याला याप्रकरणी २८ ऑक्टोबरपर्यंत तसेच इतर पाच आरोपींनाही याप्रकरणी ४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.


**पश्चिम रेल्वे**

**देखभाल काम**

वरी. डीईई/पी/बीसीटी, मुंबई सेन्ट्रल, पश्चिम रेल्वे ई-निविदा सूचना क्र: ईएल-देख-४-३२०-डब्ल्यूए-७ (आर) दि. २३.१०.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: मुंबई विभाग उपनगर अनुभाग:- २ वर्षांसाठी चर्चगेट ते विरार दरम्यान २ टीआर क्षमतेच्या प्रिसिजन एअर कंडीशनर्सचे सर्वंकष वार्षिक सेवा देखभाल कंत्राट. कामाचे अंदाजे मूल्य: रु. २२,४५,३७८/- . इरठे: रु. ४४,९००/-. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १९.११.२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ : १९.११.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०६६९

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**

**दुरुस्ती कामासाठी प्रस्ताव**

वरी. विभागिय विद्युत अभियंता (कोचिंग), मुंबई सेन्ट्रल, ४००००८ निविदा सूचना क्र: डब्ल्यूआर एमएमसीटी0ईसीओए(ईसीटीडी) / २५/२०२४ ओ/ओ एसआरडीईई / सीएचजी/ एमएमसीटी/डब्ल्यू (कॉम्प्युटर क्र. ५५९७८०), दिनांक: २३.१०.२०२४. कामाचे नाव: क्युमिंस इंजिन सीपीसीबी-I/ सीपीसीबी-II/ डीझेल इंजिन मॉडेल केटीए १९ जी ४ आणि केटीएए जी १० अनु. क्र. २५४४८९८८. (केटीएए१९जी१०), २५२९१६८९ (केटीए १९ जी४) २५२८५ १२१ (केटीए १९जी४) च्या दुरुस्ती, फिटमेंट, तपसणी आणि कार्यान्वित करण्यासाठी प्रस्ताव. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ४५,१९,८६१/- बोली सुरक्षा: रु. ९०,४००/- सादरीकरण दिनांक आणि वेळ : २१.११.२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २१.११.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक तपशीलासाठी कृपया www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०६६५

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**

**इलेक्ट्रिक लोको शेडचे काम**

**खुला ई-निविदा सूचना क्र. सीआर-जीएसयूसीएसएमटी-२०२४-९ दि. १८.१०.२०२४**

**कामाचे नाव:** २०० लोकोजच्या होमिंगसाठी सुविधांच्या निर्मितीद्वारे इलेक्ट्रिक लोको शेड, कल्याणच्या ऑगमेंटेशनकरीता ट्रॅक कार्य. **अंदाजे मूल्य:** रु. १३५.७८/- लक्ष, **इरठे:** रु. २,१७,९००/-, **पूर्तता कालावधी:** १२ महिने. I) उपरोक्त निविदेचा निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ : १९.११.२०२४ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. II) प्रस्तावित बोलीदारांना निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकाच्या तपशीलासाठी www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. III) निविदाकार उपरोक्त ई-निविदेमध्ये केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे ई-निविदेमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सहभागी होऊ शकतात आणि सदर ई – निविदेमध्ये प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते नाकारण्यात येतील किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. IV) बोली सुरक्षा ई-पेमेंट गेटवे द्वारे रोख स्वरूपात किंवा भारतामधील शेड्युल्ड व्यावसायिक बँकेकडील बँक गरंटी बॉडच्या स्वरूपात सादर किंवा निविदा कागदपत्रामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे सादर करावे. V) अधिक माहितीसाठी संपर्क करा: विभागिय रेल्वे व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय: गती शक्ती युनिट, तळ मजला, मध्य रेल्वे दूरध्वनी क्र. ०२२ ६७४५३९२८ VI) सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश दिनांकित १६-९-२०१७ अनुसार मान्यताप्राप्त आहे. निविदेचा पूर्ण तपशिल www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे.

एडीईएन (जीएसयू) सीएसएमटी

SUN 511

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**

**ओएचई फेरफार काम**

खुला ई-निविदा सूचना क्र. बीबी.एलडी.५८५. डब्ल्यू.८६७.कॉन्ट / २३-१०-२०२४

कामाचे नाव: निविदा क्र: बीबी.एलडी.५८५. डब्ल्यू.८६७.कॉन्ट. कोपरी किमी ३१/१४-१५ ठाणे येथे नवीन यार्ड आरओबी बांधकामाच्या संदर्भात ओएचई फेरफार. अंदाजे मूल्य: रु. ९२,१६,५१६/-, बोली सुरक्षा: रु. १,८४,३००/-. निविदा अर्जाचे शुल्क: ०/- पूर्तता कालावधी: १० महीने. प्रस्तावांची वैधता : ६० दिवस. (I) वरील निविदेच्या निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ: २६-११-२०२४ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. (II) प्रस्तावित निविदाकारांना विनंती करण्यात येत आहे की त्यानी निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकच्या अधिका तपशिलासाठी www.ireps.gov.in ला भेट द्यावी. (III) उपरोक्त ई-निविदेमध्ये निविदाकार केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाच्या द्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेसाठी प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते उघडण्यात किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. (IV) बोली सुरक्षेचा भरणा निविदा कागदपत्रांमध्ये देण्यात आलेल्या तपशिलानुसार करावा. (V) अधिक माहितीसाठी संपर्क करा: वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई विभाग, मध्य रेल्वे, अनेक्स बिल्डींग, २ रा मजला, सीएसएमटी, मुंबई-४००००१ दूर-०२२ २२६१२३५५ वर संपर्क करा. निविदेची पूर्ण माहिती www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. निविदेचा पूर्ण तपशिल वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई सीएसएमटी ४००००१ ह्यांच्या "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहे.

वरी. विभागिय विद्युत अभियंता (टीडी) बीबी

SUN 504

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**

**ओएचई फेरफार काम**

खुला ई-निविदा सूचना क्र. बीबी.एलडी.५८५. डब्ल्यू.८६४.कॉन्ट / २४-१०-२०२४


कामाचे नाव: निविदा क्र: बीबी.एलडी.५८५. डब्ल्यू.८६४.कॉन्ट. कळंबोली येथे श्रेणी "ए" च्या फ्रेट ट्रेन तपसणी यार्ड सुविधेच्या सुधारणेसंदर्भात ओएचई फेरफार. अंदाजे मूल्य: रु. ६६,८५,०६०/-, बोली सुरक्षा: रु. १,३३,७००/-. निविदा अर्जाचे शुल्क: ०/- पूर्तता कालावधी: १० महीने. प्रस्तावांची वैधता : ६० दिवस. (I) वरील निविदेच्या निविदा समाप्तीचा दिनांक आणि वेळ: २६-११-२०२४ रोजी ११.०० वा. पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडण्यात येतील. (II) प्रस्तावित निविदाकारांना विनंती करण्यात येत आहे की त्यानी निविदेच्या आणि जर असल्यास शुद्धिपत्रकच्या अधिका तपशिलासाठी www.ireps.gov.in ला भेट द्यावी. (III) उपरोक्त ई-निविदेमध्ये निविदाकार केवळ www.ireps.gov.in संकेतस्थळाच्या द्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेसाठी प्रत्यक्ष प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. जर प्रत्यक्ष सादर करण्यात आल्यास ते उघडण्यात किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. (IV) बोली सुरक्षेचा भरणा निविदा कागदपत्रांमध्ये देण्यात आलेल्या तपशिलानुसार करावा. (V) अधिक माहितीसाठी संपर्क करा: वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई विभाग, मध्य रेल्वे, अनेक्स बिल्डींग, २ रा मजला, सीएसएमटी, मुंबई-४००००१ दूर-०२२ २२६१२३५५ वर संपर्क करा. निविदेची पूर्ण माहिती www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. निविदेचा पूर्ण तपशिल वरिष्ठ विभागिय विद्युत अभियंता (कर्षण वितरण), मुंबई सीएसएमटी ४००००१ ह्यांच्या "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहे.

वरी. विभागिय विद्युत अभियंता (टीडी) बीबी

SUN 509

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

जगात पैशांची कमतरता नाही, तो मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांची आहे.



- ग्रँट कार्डोन
अमेरिकन उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, रविवार, २७ ऑक्टोबर २०२४



# साप्ताहिक भविष्य प्रवाह



श्री पावशे शास्त्री (गुरुजी)

२१८/डी २,
सहयोग, डी -२, गोराई २,
बोरिवली (प)., मुंबई - ९२
मो. ७७३८००६४३४

वेदमुर्ती ज्योतिषालय

**२८-१०-२०२४ ते ०३-११-२०२४ (रविवार ते शनिवार)**

**मेष-अनुकूल आठवडा जाईल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना चांगले यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सर्व दिवस आनंदी-चांगलेआहेत. सर्वस्तरावर चांगल्या गोष्टींची अनुकूलता वाढवु शकाल. कोणत्याही गोष्टीची काळजी करण्याची गरज भासणार नाही.ज्या गोष्टीचा श्री गणेशा होत नव्हतातो या सप्ताहात होणार आहे.इतरांचिही मदत वेळेवर मिळु शकेल.संघर्ष करावा लागत होता.तो आता करावा लागणार नाही.२९चावृश्चिकेतुन बुधबदल आहारनियंत्रण सुचवतोआहे.उत्साह वाढु शकेल.व्यवसायात मोठा फायदा होऊ शके ल.नोकरदार कामात पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.
**महिला-**आर्थिक बाबतीत उत्तम सफलता मिळु शकेल. शेजाऱ्यांना मदत कराल.धार्मिककार्यात सहभाग राहील. आनंदी सप्ताह असल्याने मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी-**आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-२९-३०-३१.**

**वृषभ-खर्च जपून करावेत.**
ग्रहसंकेतपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना चांगले यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वा कोणतेही महत्त्वाचे काम करताना दूरदृष्टीपणा ठेवावा लागेल.स्वत:ची जबाबदारी इतरांवर टाकून चालनार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान होऊशकते.सामाजिक कामे करतांना वादविवाद टाळावे लागतील.प्रत्येक गोष्टीत संयम ठेवने अधिक पोषक राहु शकेल.समोरच्याने एखादा सल्ला दिला तर तो ऐकून घ्यायला काही हरकत नाही.बुधबदल चांगले यश देऊ शके ल.व्यवसायात अविचाराने गुंतवणूक टाळत रहाने बरे. नोकरदार कामात लक्ष द्यावे लागेल.नियोजन करावे.
**महिला-**आर्थिकस्तर बर्यापैकी समाधान देऊशकेल.आळस कमी करने पोषक राहु शकेल.वायफळ खर्च वेळिच कमी करावे लागतील.जोडीदाराची साथ मिळु शकेल.
**विद्यार्थी-**योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभ दिनांक३१-१-२.**

**मिथुन-मनमानी करु नका.**
ग्रहसंकेत पहाता प्रतिकुल सप्ताह जानार आहे.नियोजित कामे करतांना जास्त अपेक्षा बाळगु नका.आहे त्यात कामे करत रहावे.कोनतेही कामे करतांना नियम चौकटीतच राहुन करावे लागतील.असे हे दिवस सतर्क राहून कामे करावीत.घाईगडबडीने केलेली कोणतीही गोष्ट अंगलट येऊ शकते.त्यामुळे विचार करूनच निर्णय घ्यावे लागतील.इतरांच्या वैयक्तिक गोष्टीत अजिबात हस्तक्षेप करूनका."आपले काम भले नि आपण भले"असेच वातावरण ठेवा.दिवस अनुकूल नाही.बुधबदल खर्च वाढवु शकतो.व्यवसायात नको तो व्याप वाढवुन घेऊ नका.उगीचच त्रास वाढु शकेल.नोकरदार कामातील त्रुटी वेळीच दूर करणे बरे.
**महिला-**विनाकारण दडपन घेऊन अडचनी वाढवु नका.यशासाठी प्रयत्न सुरू करा.वायफळ खर्च वेळिच सांभाळावे लागतील.कुटुंब काळजी घ्यावी. वाद टाळावेत.
**विद्यार्थी-**स्वत:च्याआरोग्याकडेही लक्ष द्यावे.
**शुभदिनांक-१-२-३.**

**कर्क-तोंडी व्यवहार टाळावेत.**
ग्रहसंकेत पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना यशात वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांचा कालावधी चांगला कसा घालवता येईल ते प हात चला.कोणत्याही कामाचे नियोजन केल्याशिवाय ते काम करू नका.नाहीतर ज्यादा कामाचा व्याप वाढु शके ल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वेळेचे बंधन पाळावे लागेल.जबाबदारीतून मोकळे होण्यासाठी घाई करून काम करायचे ठरवल्यास ते काम लांबणीवर जाऊ शकेल.आळशी वृत्ती बाजूला ठेवावी.बुधबदल पोषक राहील.व्यवसायात कामे करतांना तोंडी व्यवहार टाळने बरे राहील. नोकरदार वरिष्ठांचे काम ताबडतोब करून द्यावे लागेल.
**महिला-**आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनने बरे राहील.मित्र-मैत्रिणींशी वैचारीक सलोखा चांगला वाढेल.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल.घरगुती वातावरण चांगले राहु शकेल.
**विद्यार्थी-**आरोग्य जपत चला.
**शुभदिनांक-२८-२९-३०.**

**सिंह-उत्कर्ष होऊ शकेल.**
ग्रहबळपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.ग्रहाचे भ्रमण सुखकर असेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सर्व कामे अगदी ठरवून ठेवल्याप्रमाणे होत राहतील.त्यामुळे को णत्याही कामाचा कंटाळा येणार नाही.प्रत्येक कामात उत्साह वाटु लागेल. इतरांनी मदत करावी ही अपेक्षा तुमच्या मनामध्ये येणार नाही.स्वत:चे काम स्वत: पूर्ण करण्याची जिद्द तुमच्या मनामध्ये राहील आणि ती पूर्ण करु शकाल. कामाचा श्री गणेशा होईल.बुधबदल लाभदायक असेल.व्यवसायात देवाण-घेवाण उत्तम यशस्वी राहु शकेल. नोकरदार वर्गाचा कामाच्या ठिकाणी उत्कर्ष होऊ शकेल.
**महिला-**आर्थिक परिस्थिती चांगली असु शकेल.राजकीय क्षेत्रात शुभेच्छा मिळतील.मित्र-मैत्रिणींसोबत करमणूक होईल.आनंदी असाल. मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी-**आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-२९-३०-३१.**

**कन्या-दडपन टाळत चला.**
ग्रहबळपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगलाजाऊ शकेल.नियोजितकामे करतांना यशात बर्यापैकी वाढ होऊ शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना कुटुंबाची काळजी घ्यावी लागेल.तसा या दिवसांचा कालावधी तुम्हाला जरा अस्वस्थ करणारा असु शकेल.मात्र या कालावधीत शांत डोके ठेवून काम केल्यास त्रास होणार नाही.प्रत्येक गोष्टीत घाई करून चालणार नाही.जे तुम्हाला साध्य करायचे आहे ते करण्यासाठी न जमणाऱ्या गोष्टींच्या मागे लागू नका.संधी मिळाली की सर्वगोष्टी होतात.बुधबदल बराराहु शकेल. व्यवसाय नवीन बुधबदल करूनका.भांडवलाचा योग्य वापर करा.नोकरदार वर्गाचा कामासाठी वेळ जाऊ शकेल.
**महिला-**आर्थिक लाभ बर्यापैकी होऊ शकतील.भावंडांची मदत मिळु शकेल. तरिसुध्दा कुटुंबाची काळजी घेत लेली बरी असेल.यशाचे गणीत जुळुन येऊ शकेल.
**विद्यार्थी-**आहार सांभाळावा लागेल.
**शुभदिनांक-३१-१-२.**

**तूळ-प्रकृती सांभाळावी लागेल**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग होऊ शकेल.वेळिच काळजी घ्यावी लागेल.या दिवसांत कोणतेही काम करताना एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही.सध्याचे वातावरण उताराचे आहे असे म्हणायला हरकत नाही.शांत राहून कामे करावी लागतील.कोणी काय करावे आणि कोणी काय करू नये याचा सल्ला या दिवसांत कोणालाच देऊ नका. त्यामुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात.जबाबदारीने वागल्यास त्रास होणार नाही.बुधबदल चांगला जाऊ शकेल.व्यवसायात विनाकारण धावपळ करणे टाळनेबरे राही ल.नोकरदार वर्गाला नियमांचे पालन करावे लागु शकेल.
**महिला-**कदाचित अनपेक्षित आर्थिक लाभ होऊ शकेल. कुटुंबाशी वादविवाद टाळावे लागतील.नित्य उपासना चुकवु नये.जे आहे त्यातच समाधान मानावे लागेल.
**विद्यार्थी-**प्रकृती सांभाळावी.
शुभदिनांक-१-२-३.

**वृश्चिक-संयम ठेवलेला बरा राहील.**
ग्रहबळ पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम बाळगणे अधिक पोषक ठरुशकेल.कोणत्या वेळी काय बोलायचे कोणत्या वेळी काय बोलू नये याचासमज तुम्हाला या कालावधीत कदाचित राहणार नाही.त्यामुळे तुम्ही स्पष्ट भूमिका घ्याल.यामुळे चांगली असलेली परिस्थितीसुद्धा कदाचित बिघडू शकते. त्यापेक्षा डोक्यावर बर्फ तोंडात खडीसाखर असे सूत्र सध्या लक्षात ठेवावे लागेल,तरच दिवस चांगले जाऊ शक तील.बुधबदल बोलतांना संयम सुचवतो आहे.व्यवसायात फायदा कमी झाला तरी चालेल.नुकसान होऊ देऊनये.नोकरदार धाडसाचे निर्णय घेणे योग्य राहणार नाही.
**महिला-**कदाचितआर्थिक चणचण भासु शकेल.जरासीधावपळही होऊ शकेल.लाभात वाढ होऊ शकेल.मनमानी टाळावी लागेल. कुटुंबाशी बोलताना संयम ठेवावा.
**विद्यार्थी-**प्रकृतीकडे लक्ष द्या.
**शुभदिनांक-२८-२९-३०.**

**धनू-यशस्वी आठवडा जाईल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना घवघवीतयश मिळवु शकाल.सामाजीक कामे करतांना निरर्थक चर्चेत सहभागी होऊ नका.सामाजीक प्रतिष्ठा वाढु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदीआनंद वाढत राहील.मनोरंजनातुन समाधान मिळवु शकाल.धार्मीक कामातुन पुण्य कमवु शकाल. कुटुंबासह दूरच्या प्रवासाचे उत्तम नियोजन करु शकाल. परोपकाराचे वलय सहजपणे आत्मसात करु शकाल. होनारा बुधबदल मात्र बोलतांना संयम सुचवतो आहे.व्यवसायात चालढकल करणे टाळल्यास उत्तम लाभ होतील. नोकरदार वर्गाने कामातुन अनेक लाभ होतील.
**महिला-**आर्थिकस्तर उत्तम राहु शकेल.तरिसुध्दा उधारीचे व्यवहार टाळावे लागतील.समाजमाध्यमांचा वापर उपयुक्त ठरु शकेल.घरातले वातावरण चांगले ठेवु शकाल.
**विद्यार्थी-**प्रकृती उत्तम राहील.
**शुभदिनांक-२९-३०-१.**

**मकर-अंदाजे कृती टाळलेली बरी.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना बर्यापैकी यश मिळवु शकाल हा सर्व दिवसांचा कालावधी चढउतारांचा राहणार आहे.या कालावधीत सहनशीलता वाढवावी लागेल. जशी परिस्थिती आहे तशी स्वीकारण्याचा प्रयत्न करणे पोषक राहील. कारण नसताना उगाचच कोणत्याही गोष्टीचा वाद वाढवू नका.अंदाजे कृती करणे टाळावी लागेल.इतरांना सल्ला न दिलेलाच चांगला.कौटुंबिकस्तरावर वावरतांना समाधान मिळेल.मंगळबदल चांगलाच पोषक ठरु शकेल. व्यवसायातील जबाबदारी दुसऱ्यांवर अजिबात टाकू नका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालेल.उपासना करा.
**महिला-**आर्थिक नियोजन अधिक पक्के करावे लागेल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा करताना मागील अनुभव विसरू नका.घरातज्येष्ठ व्यक्तींचा आदर करा.
**विद्यार्थी-**योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-३१-१-२.**


**कुंभ-सहकार्य मिळवावे लागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना सावधानता बाळगावी लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सप्ताहातील सर्वच दिवस बरे आहेत.समंसपना दाखवल्यास कोणत्याही दिवसांत विशेष काळजी करण्याची गरज नाही.त्यामुळे मनामध्ये वारंवार जो नकारात्मक विचार येत होता तोही आता कदाचित येणार नाही.काम करायला ही उत्साह वाटु लागेल.अडचणीचा कालावधी हळुहळु कमी होऊ शकेल.तणावाचे वातावरणच नाही असे नाही.जपुन रहावे.बुधबदल बरा राहील.व्यवसाय करतांना फायद्याचे प्रमाण साधारण राहु शकेल. नोकरदार वर्गाला कदाचित नोकरीचे प्रस्ताव येतील.
**महिला-**वरिष्ठांचे सहकार्य गोडबोलुन मिळवावे लागेल.कदाचित आर्थिक लाभ होऊ शकतील.मनमानी-राग-आळस हे सर्व वेळिच टाळलेले बरे राहु शकेल.उपासना करा.
**विद्यार्थी-**आरोग्य जरा नरम राहील.
शुभदिनांक-१-२-३.

**मीन-लाभ होऊ शकतील.**
ग्रहप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना घाईगडबड करु नये.सर्व दिवस साधारण चांगले असु शकतील. प्रत्येक वेळी होणारा संघर्ष सध्या तितकासा जाणवणार नाही.सकारात्मक गोष्टी घडु शकतील.उगाचच घाईगडबड करून कोणतेही काम करण्याची सध्या तरी गरज नाही.सध्या तुम्ही जे ठरवणार आहात त्याप्रमाणे बहुतांशी काम होत राहील.तेव्हा इतरांचे मार्गदर्शनही चांगले मिळेल.जी धरसोड वृत्ती होती तीसुद्धा कमी होईल.बुधबदल चांगला राहु शकेल.व्यवसायातील परिस्थिती नेहमीप्रमाने बरी राहु शकेल.नोकरदार वर्गाला पर्यायी गोष्ट स्वीकारणे योग्य राहु शकेल.
**महिला-**आर्थिक लाभ बर्यापैकी होऊ शकेल.सार्वजनिक क्षेत्रात सामूहिक गोष्टींची आवड राहील.नातेवाईकां शी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होऊ शकतील.
**विद्यार्थी-**प्रकृती बरी राहील.
**शुभदिनांक-२८-२९-३०.**

# विजय वैद्य गेले ; समाजसेवेचे एक पर्व संपले!

**योगेश वसंत त्रिवेदी**

समाजसेवेचा मानबिंदू, अनेक संस्था संघटनांच्या प्रसववेदनांच्या कळा सहन करुन त्या तब्बल बेचाळीस वर्षे अहोरात्र चालविणारे विजय दत्तात्रय वैद्य यांनी ऐन गणेशोत्सवात आपली इहलोकीची यात्रा संपवून परलोकी प्रस्थान ठेवले. बरोबर पंचवीस दिवसांपूर्वी विजय शंकर केळुसकर यांनी इहलोकीची यात्रा संपविली. तो धक्का सहन होत नाही तोपर्यंत दुसरा जबरदस्त धक्का देणारे समाजसेवेचे एक पर्व विजय वैद्य यांच्या देहावसानाने संपले. १९२१ च्या १६ ऑक्टोबर रोजी केशव सीताराम ठाकरे यांनी प्रबोधन नांवाचे नियतकालिक सुरु केले आणि १६ ऑक्टोबर २०२१ रोजी या 'प्रबोधन'ची शताब्दी संपन्न झाली. प्रबोधन हे केशवराव ठाकरे यांनी सुरु केले असल्याने ओघानेच त्यांच्या नावापुढे प्रबोधनकार ही उपाधी लागली. प्रबोधनकार ठाकरे यांच्या आयुष्यातील चढ उतार, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचा सहभाग, अंधश्रद्धा विरोधात केलेले कार्य, विविध प्रकारच्या भूमिका मग सामाजिक, राजकीय क्षेत्रातील असो की प्रत्यक्ष चित्रपटात काम करणे कुठेही ते कमी पडले नाहीत. परखड पणे मते मांडतांना कुणाचाही मुलाहिजा त्यांनी बाळगला नाही. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पासून अनेक दिग्गज मंडळी त्यांच्या संपर्कात होती. हा सारा इतिहास आपल्याला त्यांच्या 'माझी जीवनगाथा' यातून मिळतो. ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत आणि विजय वैद्य ही जोडगोळी प्रबोधनकार ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या परीसस्पर्शाने पावन झालेली आहे. विजय वैद्य हे तसे जव्हारचे. पूर्वीच्या ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथून विजय वैद्य मुंबईला आले. चेंबूरला वास्तव्यास असतांना ते टाइम्स ऑफ इंडियाच्या जॉब डिपार्टमेंट मध्ये नोकरी करीत होते. जेमतेम ४६८ रुपये पगार होता. लग्न झालेले नव्हते. एकटा जीव सदाशिव. हरहुन्नरी आणि चळवळ्या स्वभाव. चेंबूरला असतांना त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानात विजय वैद्य यांनी एक बातमी शोधून काढली. तडक गिरगाव गाठले. नवाकाळ मध्ये निळूभाऊ खाडिलकर यांना भेटून बातमी दिली. भाऊंनी ती पहिल्या पानावर ठळकपणे छापली. 'बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांची संघटना स्थापन करणार !' अशा आशयाची ती बातमी होती. योगायोगाने बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना बोलावून घेतले आणि त्यांना विचारले तुम्हाला ही बातमी कशी समजली ? अहो साहेब, तुम्हीच भाषणात बोललात मराठी माणसाची संघटना स्थापन करणार म्हणून. तो १९६६ चा मे महिना होता आणि बरोब्बर १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारी 'शिवसेना' अस्तित्वात आली. या निमित्ताने विजय वैद्य यांची बाळासाहेब ठाकरे यांच्या घरी ये जा वाढली. तिथेच दादा म्हणजे प्रबोधनकार ठाकरे यांच्या समवेत संवाद साधण्याची संधी विजय वैद्य यांना मिळाली. एकदा प्रबोधनकार ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विजय वैद्य यांनी दादांना फोनवरुन शुभेच्छा दिल्या. दादा भडकले. त्यांच्या शैलीत म्हणाले, "काय रे ? एवढा मोठा झालास ? फोनवरून मला आशीर्वाद देतोस ? वैद्यांची पाचावर धारण बसली. दादा, आलोच असे म्हणत त्यांनी दादांचे घर गाठले. तिथे दादा आणि वैद्य यांचे संभाषण झाले. दादा म्हणाले माझ्या पुस्तकाचे प्रकाशन आहे. तू येतोस नां ? दादा, दांडी मारावी लागेल. तिथे प्रा. अनंतराव काणेकर बसले होते. त्यांनी काय विजयराव ? असे म्हणताच दादा म्हणाले, काणेकर, तुम्ही यांना ओळखता ? होय दादा, फार चांगले काम करताहेत हरवलेल्या मुलांचा शोध घेण्याचे. काणेकर म्हणताच दादा म्हणाले, होय, चांगला आहे पण आगाऊ आहे. दादांनी ठेवणीतली कोपरखळी मारली. वैद्य यांनी शरणागती पत्करली आणि होय, दादा येतो कार्यक्रमाला. आणि मग प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'माझी जीवनगाथा' या आत्मचरित्राचा प्रकाशन समारंभ झाला. त्याचा हंशा, टाळ्यांसह वृत्तांत विजय वैद्य यांनी दिला. तो दादांना आणि बाळासाहेब ठाकरे यांना अतीशय आवडला. प्रबोधन शताब्दी निमित्ताने याचा बऱ्याच वेळा उल्लेख झाला. हाच वृत्तांत डॉ. मनोहर जोशी यांच्या 'शिवसेना : काल, आज आणि उद्या' या पुस्तकात संपूर्ण प्रसिद्ध करण्यात आला आहे. २००० साली बोरीवली येथे प्रबोधनकार ठाकरे नाट्य मंदिराचे उद्घाटन बाळासाहेब



ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी विजय वैद्य यांनी लिहिलेल्या 'आठवणीतले प्रबोधनकार' या छोटेखानी पुस्तिकेचे प्रकाशन बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झाले होते. पण बाळासाहेबांच्या वाट्याला जेमतेम एक पुस्तक आले म्हणून त्यांनी रवि म्हात्रे यांच्या मार्फत विजय वैद्य आणि विनोद घोसाळकर यांना निरोप दिला की, उद्या सकाळी जेवढी पुस्तके असतील तेवढी घेऊन या. दोघे हादरले. काय वाढून ठेवलंय कुणास ठाऊक ? इकडून तिकडून पंचवीस पुस्तके जमा करुन वैद्य आणि घोसाळकर मातोश्रीवर पोहोचले. काय रे किती पुस्तके आणलीत ? करड्या कठोर स्वरात बाळासाहेबांनी विचारणा केली. साहेब, पंचवीस आणलीत, चोवीस तुमच्या साठी आणि एक सही करुन मला. एवढी पुस्तके काय करु ? सही ? आणि माझी ? अरे, तू दादांची सही जपून ठेवली नाहीस तिथे माझी काय जपून ठेवणार ? साहेब ? तुम्ही पुस्तक वाचलंत ? अरे, वाचलंच नाही तर पारायणं केलीत. मला प्रचंड आवडलं. बरं, ते जाऊ दे. मला याची तीन हजार पुस्तके छापून पाहिजेत. यात तुला काय आणखी घालायचे ते घाल. काय वाट्टेल ते कर. वैद्य आणि घोसाळकर लागले कामाला. २००१ साली 'आठवणीतले प्रबोधनकार' च्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने आणि वर्षामागून वर्षे लोटली. अचानक चिपळूण चे धडाकेबाज आमदार आणि शिवसेना नेते भास्करराव जाधव यांनी विजय वैद्य यांना फोन केला. आप्पा, मला तुम्हाला भेटायचंय. झाले वैद्य आणि भास्करराव यांची भेट झाली. भास्करराव म्हणाले, आप्पा, मी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये असतांना मला कुणीतरी'आठवणीतले प्रबोधनकार' हे पुस्तक आणून दिले. मी ते संपूर्ण वाचून काढले. महाराष्ट्रात प्रत्येक शिवसैनिकांनी हे पुस्तक वाचलेच पाहिजे, असं मला वाटतं. आणि चक्रं फिरली. उदय पै या कलामहर्षिंना गाठलं. सगळी जुळवाजुळव झाली. जगद्विख्यात चित्रकार वासुदेव कामत यांनी काढलेले प्रबोधनकार ठाकरे यांचे संपूर्ण जीवन दर्शविणारे चित्र प्रबोधन प्रकाशन यांच्या सौजन्याने उदय पै यांनी उपलब्ध करुन दिले. सुदेश म्हात्रे यांनी आवर्जून आठवण करुन दिली. सर्वच संबंधित व्यक्ती पुढे सरसावल्या आणि गुरुवार, ९ डिसेंबर २०२१ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या भव्य सभागृहात बाळासाहेब ठाकरे यांच्या समवेत शिवसेनेच्या प्रारंभापासून असलेले आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात उद्योग मंत्री म्हणून कार्यरत असलेले सुभाष देसाई यांच्या हस्ते पंढरीनाथ सावंत, शिवसेना नेते आमदार भास्करराव जाधव, विक्रांत भास्करराव जाधव, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, मंदार पारकर, महेश म्हात्रे यांच्या उपस्थितीत आठवणीतले प्रबोधनकार या विजय वैद्य यांच्या पुस्तकाच्या चित्ताकर्षक, विचारप्रवर्तक अशा तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन भारलेल्या आणि भारावलेल्या वातावरणात संपन्न झाले. शनिवार १४ सप्टेंबर २०२४ चा दिवस उजाडला तोच दुःखद बातमीने. शुक्रवारी संपूर्ण दिवस उपनगरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळच्या आमंत्रणांचे वाटप करुन रात्री ९ वाजेपर्यंत उपनगरचा राजा च्या मांडवात बसून पुढच्या कार्यक्रमांची आखणी केली आणि रात्री वैभव या मोठ्या मुलाकडे गेले. सकाळी सहाच्या सुमारास प्रकृती अस्वास्थ्यामुळे डॉक्टरांकडे जायला निघाले. पण तिथेच ते कोसळले. वयाच्या ८२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. धावाधाव झाली. फोनाफोनी झाली. तासाभरात त्यांनी लहानाचे मोठे केलेले कार्यकर्ते धावत आले. पत्रकार, नेतेमंडळी, रिक्षाचालक, घरेलू कामगार आदी सर्वच क्षेत्रातील लोकांची रीघ लागली. विजय वैद्य यांच्या शेवटच्या इच्छेनुसार शनिवारची सर्व वर्तमानपत्रे आणून पार्थिवाजवळ ठेवली. स्वर्गरथातून महायात्रा सुरु झाली. जय महाराष्ट्र नगर येथील निवासस्थानी हा स्वर्गरथ आणण्यात आला आणि तेथे सर्वांनी हंबरडा फोडला. पण रडायचं नाही, लढायचं, दुःखात नव्हे आनंदात मला निरोप द्या, असे त्यांनी सांगितले असल्याने बॅंड पथकाने भक्तीगीते वाजवून त्यांना मानवंदना दिली. जय महाराष्ट्र नगरातील तब्बल बेचाळीस वर्षांचं पर्व अखेर १४ सप्टेंबर रोजी संपलं. हे ईश्वरा त्यांच्या आत्म्याला शांती दे एवढीच प्रार्थना !

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकीय विश्लेषक आहेत)**

वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, रविवार, २७ ऑक्टोबर २०२४

## दिवाळीनिमित्त बाजारात खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**ठाणे :** दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या दिवाळी सणानिमित्ताने ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातील बाजारपेठांमध्ये नागरिकांनी कपडे, कंदील, विद्युत दिवे, रांगोळी आणि दिवाळी साहित्य खरेदीसाठी शनिवार सकाळपासूनच गर्दी केली होती. यामुळे गोखले रोड, राम मारुती रोड, जांभळी नाका, ठाणे स्थानक परिसरातील मार्गांवर वाहनांचा भार वाढून कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. या कोंडीमुळे नागरिकांना दहा मिनिटाचे अंतर पार करण्यासाठी २० ते २५ मिनीटाचा कालावधी लागत आहे. ही कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची दमछाक होताना दिसून आली. सोमवारपासून दिवाळी सणाला सुरूवात होणार आहे. दिवाळी सणाकरिता नागरिक कपडे, कंदील, विद्युत दिवे, पणत्या, रांगोळी असे साहित्य खरेदी करतात. यामुळे दिवाळीच्या पंधरा दिवस आधीपासूनच दिवाळी साहित्य विक्रीसाठी बाजारपेठेत येते आणि त्याठिकाणी नागरिक खरेदीसाठी गर्दी करताना दिसून येतात. हेच चित्र ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातील गोखले रोड, राम मारुती रोड, जांभळी नाका, ठाणे स्थानक परिसरातील बाजारपेठांमध्ये गेल्या काही दिवसांपासून दिसून येत आहे.



## महत्त्वाचे

### मोबाईल चोरीच्या संशयावरुन एकाची हत्या

**भिवंडी :** भिवंडी येथील शांतीनगर पाईपलाईनजवळील परिसरात शनिवारी आढळून आलेल्या मृतदेहाची ओळख पटली असून मोबाईल चोरीच्या संशयावरुन त्याची हत्या झाल्याची बाब शांतीनगर पोलिसांच्या तपासात उघडकीस आली आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी आतापर्यंत सात आरोपींना अटक केली आहे. आरोपींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. भिवंडी येथील शांतीनगर पाईपलाईनजवळील परिसरात शनिवारी एका तरुणाचा बेवासर मृतदेह आढळला होता. त्याची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले असून त्याचे नाव मोहम्मद रहमत शहा आलम (२०) आहे. तो मूळचा कोलकत्ता येथील रहिवाशी आहे. सहा महिन्यांपूर्वी तो कामानिमित्त भिवंडीत आला होता. भिवंडीतील सहयोगनगर येथे राहणाऱ्या मोहम्मद अरमानच्या एका साथीदाराचा मोबाईल चोरीला गेला होता. त्यावेळी त्यांनी मोहम्मद रहमत शहा आलम याची झडती घेतली. यावेळी आलम याच्याकडे चार ते पाच मोबाईल सापडले होते. त्यामध्ये आरमानच्या साथीदारांच्या मोबाईलचा समावेश होता. त्यामुळे मोबाईल चोरीच्या संशयावरुन अरमान आणि त्याच्या साथीदारांनी बुधवारी गोविंदनगर येथील पाईपलाईन रोड परिसरात मोहम्मद रहमत शहा आलम याला लाकडी दांडक्याने आणि हाताने बेदम मारहाण केली.

### बचत गटांच्या सरस महोत्सवांना आचार संहितेची झळ

**ठाणे :** दिवाळीच्या मुहूर्तावर विविध खाद्यपदार्थ, पणत्या, शोभेच्या वस्तू, विद्युत रोषणाई यांची महिला बचत गटांकडून जोरदार विक्री करण्यात येते. यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे तालुक्यांच्या ठिकाणी भव्य असे सरस महोत्सव भरवले जातात. यातून काही लाख रुपयांची आर्थिक उलाढाल देखील होते. मात्र यंदा दिवाळीच्या कालावधीत विधानसभा निवडणुकीचा आचार संहितेचा काळ असल्याने हे सर्व सरस महोत्सव यंदा रद्द करण्यात आले आहे. यामुळे महिला बचत गटांचा हिरमोड झाल्याचे दिसून येत आहे. ठाणे जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांचे जाळे पसरले आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत सुमारे १० हजार महिला बचत गट असून याद्वारे एक लाख महिला बचत गटांना जोडल्या गेल्या आहेत. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून भरीव निधीची तरतूद झाल्याने जिल्ह्यातील बचत गटांनी उभारी घेतल्याचे विविध गटांच्या उपक्रमातून दिसून येत असते.

# ठाणे पालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड
## सानुग्रह अनुदानापाठोपाठ वेतन दिवळीआधी जमा होणार

प्रतिनिधी
■ ठाणे

गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या ठाणे महापालिकेने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात सानुग्रह अनुदान दोन दिवसांपूर्वी जमा केले असून त्यापाठोपाठ आता दिवाळीपूर्वी वेतनही बँक खात्यात जमा करण्याची तयारी सुरू केली आहे. यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे. पालिकेच्या वर्ग एकच्या अधिकाऱ्यांनी सानुग्रह अनुदानाची रक्कम घेतली नसल्यामुळे पालिकेच्या ७० लाखांची बचत झाली आहे.



ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवर ७ हजार ५७८ अधिकारी आणि कर्मचारी आहेत. त्यामध्ये महापालिकेचे ६५०९, शिक्षण विभागाचे ६९७, महापालिका कंत्राटी ७३, अनुकंपा ६६ आणि इतर २३३ कर्मचारी कार्यरत आहेत. तर पालिका परिवहन विभागात १५०० च्या आसपास कर्मचारी आहेत. याशिवाय कंत्राटदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या २५०० च्या आसपास आहे. ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गेल्यावर्षी २१५०० रुपये इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले होते. यंदाच्यावर्षी त्यात २५०० रुपयांची वाढ करून ठाणे पालिकेच्या कर्मचाऱ्यांना २४००० रुपये एवढे सानुग्रह अनुदान देण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. यानंतर पालिका प्रशासनाने दिवाळीच्या आठ दिवस आधीच कर्मचाऱ्यांच्या खात्यात सानुग्रह अनुदान जमा करण्याची तयारी सुरु केली होती. यानुसार दोन दिवसांपूर्वी सर्व कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात सानुग्रह अनुदानाची रक्कम पालिकेने जमा केली आहे. यामुळे पालिकेच्या तिजोरीवर २१ ते २२ कोटींचा बोजा पडला आहे.

गेल्या काही वर्षांपासून पालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. यामुळे पालिकेचे तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी दोन वर्षांपूर्वी वर्ग एकच्या अधिकाऱ्यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम घेऊ नका असा सल्ला दिला होता. त्यावेळी काहींनी नाराजी व्यक्त केली होती. मात्र, गेल्यावर्षी वर्ग एकच्या अधिकाऱ्यांनी बांगर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सानुग्रह अनुदान घेतले नव्हते. हिच परंपरा यंदा वर्ग एकच्या अधिकाऱ्यांनी कायम ठेवत सानुग्रह अनुदान घेतलेले नाही. यामुळे पालिकेच्या तिजोरीत ७० लाखांची बचत झाली आहे. सानुग्रह अनुदानापाठोपाठ आता दिवाळीपूर्वी वेतनही बँक खात्यात जमा करण्याची तयारी सुरू केली आहे. यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे.

## कथोरेंना राजकारणातील ग-म-भ-न शिकवणारे माझे वडीलच
### सुभाष पवारांनी आमदार कथोरेंचा घेतला खरपूस समाचार

प्रतिनिधी
■ बदलापूर

किसन कथोरे यांना माझ्या वडिलांनी मोठी मदत केली होती. त्यांची राजकीय सुरूवात माझ्या वडिलांनी सुरू करून दिली. तसेच ते जिल्हा परिषद अध्यक्ष होण्यासाठी माझ्या वडिलांकडे येत होते, असे सांगत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे मुरबाडचे उमेदवार सुभाष पवार यांनी आमदार किसन कथोरे यांचा खरपूस समाचार घेतला. वडिलांना पाडले आहे तर मुलालाही पाडू असे वक्तव्य किसन कथोरे यांनी दोन दिवसांपूर्वी केले होते. त्यावर बोलताना शनिवारी पवार यांनी हे वक्तव्य केले. अरेरावीने बोलणे हे कथोरेंची ख्याती आहे, असेही पवार यावेळी म्हणाले.



आमदार किसन कथोरे यांनी महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार सुभाष पवार यांच्यावर पहिल्या दिवसापासून थेट हल्लाबोल चढवला. त्यांना उमेदवारी जाहीर होताच त्यांनी मतदारसंघात ठेकेदार हवा का असा प्रश्न उपस्थित करत पवार यांना लक्ष्य केले होते. तर अर्ज भरण्याच्या दिवशी माजी आमदार गोटीराम पवार यांचा केलेल्या पराभवावर बोट ठेवत, वडिलांना पाडले तर मुलालाही पाडू असे वक्तव्य केले होते. सुभाष पवार यांचे वडील गोटीराम पवार हे चार वेळा मुरबाड विधानसभा मतदारसंघात आमदार होते. सुरूवातीला कथोरे पवार यांच्याच नेतृत्वात स्थानिक पातळीवरच्या निवडणुका लढले होते. याच इतिहासाची आठवण करून देत सुभाष पवार यांनी शनिवारी कथोरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. किसन कथोरे यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरूवात वडिलांमुळेच झाली होती. जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठी ते वडिलांना भेटायला यायचे, असे सांगत त्यांनी कथोरे यांना वडिलांनी मोठी मदत केल्याचा पुनरूच्चार केला. तसेच अरेरावीणे बोलणे हा कथोरेंचा इतिहास आहे, असेही ते म्हणाले.



*मीरा भाईंदर नगर भवन अभ्यासिकेत भेट देऊन युवा मतदारांना मतदान करण्याचे आव्हान करण्यात आले*

## माथेरानमधील ठाकरे गटातील कार्यकर्त्यांची नाराजी दूर

प्रतिनिधी
■ माथेरान

दोन दिवसांपूर्वी माथेरानमधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देत अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांच्या पाठिशी उभे राहण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी राजीनामा पत्र ईमेलने पाठवले होते. मात्र, अवघ्या २४ तासांत त्यांची नाराजी दूर करण्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना यश आले आहे. एवढेच नाही तर तुम्ही निष्ठावंत आहात आणि गद्दारांचा बंदोबस्त करून त्यांना पराभूत करायचे आहे. त्यामुळे कामाला लागा, असा आदेश उद्धव ठाकरे यांनी या पदाधिकाऱ्यांनी दिला. त्यामुळे माथेरानमधील ठाकरे गटाचे सर्व पदाधिकारी पुन्हा एकवटले असून एकदिलाने नितीन सावंत यांच्या पाठिशी उभे राहिले आहेत.



कर्जत-खालापूर मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या ठाकरे गटातून नितीन सावंत यांनी उमेदवारी दिली आहे. त्यामुळे काहीजण नाराज झाले. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेसमधून उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज होऊन बाहेर पडलेले सुधाकर घारे यांना माथेरानमधील ठाकरे गटातील पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा देत पदाचे राजीनामे पक्षाकडे ईमेलने पाठवले होते. याची दखल घेत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वांना तातडीने चर्चेला 'मातोश्री'वर बोलावले. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत, मिलिंद नार्वेकर, किशोरीताई पेडणेकर, अनिल परब, विनायक राऊत आदी उपस्थित होते. आताची लढाई निष्ठावंत विरुद्ध गद्दार आहे, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नितीन सावंत आपले उमेदवार आहेत आणि गद्दारांना बंदोबस्त करायचा आहे.

## दिव्यातील रत्यावरील अनधिकृत फटाका स्टॉलला परवानगी कोणाची ?

प्रतिनिधी
■ दिवा

ठाणे महानगर पालिका हद्दीतील दिवा शहरातील मुख्य वर्दळीचे रस्ते, पदपथांवर बहुतांशी फटाका विक्रेत्यांनी कोणत्याही परवानग्या न घेता फटाके विक्रीचे स्टॉल उभारले आहेत. कोणतीही परवानी न घेता फटाके विक्रीचे बहुतांशी मंच हे राजकीय मंडळींचे समर्थक असल्याची चर्चा सुरु आहे.



ठाणे महापालिका कर्मचारी विधानसभा निवडणूक कामात व्यस्त आहेत. या कामामुळे पालिका मुख्यालय, प्रभागातील अधिकारी, कामगारांना प्रभागातील फटाके विक्रीचे मंच याकडे लक्ष देण्यास सध्या वेळ नाही. दिवा स्थानक, दिवा अगासन मुख्य रस्ता , मुंब्रादेवी कॉलनी या भागात अनधिकृत फटाका स्टॉल थाटले गेले असून काही अनुचित प्रकार घडल्यास जबाबदार कोण ? असा प्रश्न निर्माण झाला असून हे अनधिकृत स्टॉल हटविण्याचे काम कोण करणार. दिवा पूर्व रेल्वे स्थानक भागातील रस्ते, पदपथ, शहरांच्या अंतर्गत वर्दळीच्या रस्त्यांवर हे फटाके विक्रीचे मंच थाटण्यात आले आहेत दिवाळीच्या दहा दिवसाच्या कालावधीत फटाके विक्रीतून चांगली कमाई मिळते या विचारातून काही तरूण भागीदारी पध्दतीने ही दुकाने चालवित आहेत.

## पालिकेच्या दिवाळी पहाट कार्यक्रमात प्रियंका बर्वे आणि आनंद भाटेंची मैफिल

प्रतिनिधी
■ पनवेल

लखलखत्या दिव्यांचा उत्सव असणाऱ्या दिवाळीच्या प्रारंभी पनवेलकरांसाठी महानगरपालिकेच्यावतीने शुक्रवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी पहाटे ५.३० वाजता आनंद गंधर्व पंडीत आनंद भाटे आणि सुप्रसिद्ध गायिका प्रियांका बर्वे सुश्राव्य गाण्यांची मैफिलीचे आयोजन वडाळा तलाव परिसरात करण्यात आले आहे.



गेल्या काही वर्षांपासून महानगरपालिकेच्यावतीने पनवेलकरांची दिवाळी सुरमयी व्हावी यासाठी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करते आहे. यावर्षीही पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना दिवाळीच्या प्रारंभी नाट्यसंगीत, भावसंगीत, भक्तिसंगीतावर आधारित आनंद गंधर्व पंडीत आनंद भाटे आणि गायिका प्रियांका बर्वे सुश्राव्य गाण्यांची संगीतमय मेजवानी देण्यासाठी महापालिकेच्यावतीने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या दृष्टीने यावर्षी दिवाळी पहाट कार्यक्रमाकरीता कोणीही प्रायोजक न नेमण्याचा निर्णय मा. आयुक्तांनी घेतला असून, दिवाळी पहाट कार्यक्रम पनवेल महानगरपालिकेमार्फत साजरा करण्यात येणार आहे. सर्वांसाठी विनामूल्य असणाऱ्या या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. वयाच्या सतराव्या वर्षी पंडित भीमसेन जोशी यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे धडे गिरवलेल्या पंडीत आनंद भाटे यांच्या नाट्यसंगीत, भावसंगीतातील कौशल्यने ,बालगंधर्वाच्या गायन शैलीना अनुरूप गायन कले मुळे त्यांना आनंद गंधर्व ही पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

सुप्रसिद्ध गायिका प्रियंका बर्वे यांनी चंद्रमुखी, मी वसंतराव, आटपाडी नाईट्स, आनंदी गोपाळ, चोरीचा ममला अशा विविध मराठी चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले आहे.

## मिरा भाईंदर मतदारसंघात 145 E. V. M. मशीन संच दाखल

■ भाईंदर

आगामी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - 2024 च्या पार्श्वभूमीवर आज दि. 26.10.2024 रोजी मा. जिल्हा अधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांच्या निर्देशनुसार सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशन, तुर्भे, नवी मुंबई येथून CU 603 व BU 603 तसेच बॅटरी असा E. V. M. मशीन संच स्व. प्रमोद महाजन सभागृह, फेज - 11, गोडदेव, भाईंदर (पू.) येथील स्ट्रॉंग रूम मध्ये दुपारच्या वेळी ठेवण्यात आले.

सदर प्रसंग मा. निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भूताळे, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी निलेश गौंड, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी कल्पिता पिंपळे, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार घरत, निवडणूक नायब अधिकारी प्र-दीप मुकणे, मा. नोडल अधिकारी (स्ट्रॉंग रूम पथक) व अन्य मा. नोडल अधिकारी सह शहरातील राजकीय पक्ष / अपक्ष यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## आमदार बालाजी किणीकरांचे स्वपक्षियांसमोर लोटांगण

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबरनाथमध्ये शिवसेनेचे विद्यमान आमदार डॉ. बालाजी किणीकर आणि स्थानिक माजी नगराध्यक्ष अरविंद वाळेकर यांच्यातील वादावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी नुकताच पडदा टाकला. त्यानंतर डॉ. किणीकर यांनी वाळेकरांचे वर्चस्व असलेल्या शिवसेना शहर शाखेत जाऊन गेल्या चुकांबद्दल कार्यकर्त्यांकडे दिलगिरी व्यक्त केली. अवघ्या काही मिनिटांच्या संवादात डॉ. किणीकर यांनी तीनदा दिलगिरी व्यक्त केली. तसेच यापुढे स्थानिक पातळीवर अरविंद वाळेकरांच्याच नेतृत्वाखाली पक्षाचे काम करण्याचेही कबूल केले. ही दिलगिरी आणि कबुलीनामा शाखेत पदाधिकाऱ्यांसमोर होता. मात्र तो समाज माध्यमांवर प्रसारीत झाल्याने अनेक चर्चाही रंगल्या आहेत.



अंबरनाथ विधानसभा मतदारसंघात गेल्या काळात शिवसेनेचे आमदार डॉ. बालाजी किणीकर आणि पक्षाचेच माजी शहरप्रमुख तथा नगराध्यक्ष अरविंद वाळेकर यांच्यात उघड संघर्ष सुरू होता.

## शरद पवार गटाला धक्का; ऐन दिवाळीत मुरबाडमध्ये फुटणार बंडखोरीचे फटाके

प्रतिनिधी
■ मुरबाड

मुरबाड विधानसभेतील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी शहराध्यक्ष शैलेश वडनेरे यांनी अखेर अपक्ष लढण्याची भूमिका जाहीर केली आहे. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी उमेदवारीचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचं वडनेरे यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बदलापूर शहराध्यक्ष असलेले वडनेरे मागील अडीच वर्षांपासून आमदारकीची तयारी करत होते. वरिष्ठ नेत्यांनी आपल्याला उमेदवारीचा शब्द दिल्याचा दावा त्यांनी केला होता. मात्र निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेतून राष्ट्रवादीत आलेल्या सुभाष पवार यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केल्यामुळे आता वडनेरे यांनी बंडखोरीचा मार्ग स्वीकारला आहे. त्यांनी यापूर्वीच राष्ट्रवादी शरद पवार गटाचा राजीनामा दिला असून अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचं जाहीर केलं आहे. २८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. त्यामुळे मुरबाड विधानसभेत मतांचं विभाजन होऊन राष्ट्रवादीच्या उमेदवाराला फटका बसण्याची शक्यता व्यक्त होतेय. दरम्यान मुरबाडमध्ये शरद पवार गटाकडून सुभाष पवार यांना उमेदवारी देण्यात आलीय. या मतदारसंघात आमदार किसन कथोरे आणि सुभाष पवार यांच्यात लढत होणार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार सुभाष पवार राजकारणासोबतच त्यांच्या जनसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून कार्यरत असतात. नवरात्रोत्सवाच्या काळात जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने नारीशक्ती सन्मान सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून ६५ जागांची उमेदवारी यादी जाहीर करण्यात आली. पण यामध्ये तीन ते चार नावांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. जागावाटपाची चर्चा सुरु असताना ठाकरेंकडून उमेदवाराची यादी जाहीर केल्यामुळे टीका झाली होती. त्यात महाविकास आघाडीचा नवा फॉर्म्युला समोर आला असून ठाकरे गट, काँग्रेस, शरद पवार गट ९० जागांवर निवडणूक लढवणार आहे.

## विधानसभा निवडणूकीत सर्वांनी मतदान करावे याबाबत शाळा, महाविद्यालयांतून विविध उपक्रमांद्वारे जनजागृती

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 20 नोव्हेंबर 2024 रोजी संपन्न होत असून या निवडणुकीमध्ये प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता विविध माध्यमांचा प्रभावीपणे वापर करण्यात येत आहे. याकरिता निवडणूक कार्यालयांप्रमाणेच महानगरपालिकेच्या वतीनेही आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वीपचे जिल्हा निवडणूक कार्यालय नियुक्त 150 व 151 विधानसभा मतदारसंघांचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील पवार यांचा नियंत्रणाखाली आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.



यामध्ये शालेय व महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांना सोबत घेऊन विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून आज ऐरोली डीएव्ही पब्लिक स्कुल या ठिकाणी विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या संख्येने एकत्र येत रॅलीद्वारे जनजागृती केली तसेच मतदानाची सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. अशाच प्रकारे सेक्टर 3, ऐरोली येथील श्रीराम विद्यालयातही विद्यार्थी, पालकांनी शिक्षकांसह एकत्र येऊन शाळा परिसरात रॅलीद्वारे जनजागृती केली तसेच विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती पथनाट्यही सादर केले.

सेक्टर 4, ऐरोली येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालय व महाविद्यालयात एनएसएस विद्यार्थ्यांनी परिसरात मतदार जनजागृती रॅली काढली त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी आयोजित निबंध, पोस्टर, रांगोळी स्पर्धेला उत्साही सहभाग लाभला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करीत मनोरंजनाद्वारे जागरूकता निर्माण केली. नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक 42 घणसोली येथील विद्यार्थ्यांनी स्वतः मतदान जागृतीचे फलक तयार करून फलक उंचावत, घोषणा देत शिक्षकांसह शाळा परिसरात रॅली काढून लोकांना 20 नोव्हेंबर रोजी मतदान करण्याचा संदेश दिला. दिघा येथील संजीवनी विद्यालयानेही रॅली व इतर उपक्रमांचे आयोजन केले. विशेष म्हणजे नमुंमपा शाळा क्रमांक 18, सेक्टर 5, सानपाडा येथील शाळेत पालकांनी मतदार जनजागृतीपर रांगोळी काढून जागरूक नागरिकत्वाचे दर्शन घडवले, त्याचप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांनी रॅलीद्वारे जनजागृती केली.

## एक हजार पोस्टकार्डांवर भारती विद्यापीठ शाळेतील विद्यार्थ्यांनी दिला मतदान करण्याचा संदेश

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान वाढीसाठी विधानसभा निवडणूक कार्यालय व महानगरपालिका यांच्या वतीने विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न सुरू असून यामध्ये विद्यार्थ्यांची मदत घेतली जात आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.



असाच एक अभिनव उपक्रम भारती विद्यापीठ प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, नवी मुंबई शाळेच्या विद्यार्थ्यांनी राबविला. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना आणि नातेवाईकांना एक हजाराहून अधिक पत्रांतून मतदान करण्याविषयी आवाहन केले. हा अनोख्या पध्दतीने व्यापक स्वरूपात राबवण्यात आलेला मतदान जनजागृतीचा उपक्रम शाळेतील कलाशिक्षक श्री. नरेश लोहार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. या विद्यार्थ्यांनी पत्रांतून आपल्या आई-वडिलांना व नातेवाईकांना - बुधवार, दि. 20 नोव्हेंबर 2024 रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानादिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून माझ्या व भारताच्या उज्वल भविष्यासाठी आपण जरूर मतदान करावे आणि भारताची लोकशाही बळकट करावी ही विनंती, माझेही वय 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर मीही मतदान करेन असे लिहिले आहे. तसेच मतदानादिवशी लागणारी ओळखपत्रे म्हणून पॅन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन, मतदार ओळखपत्र, बँक पासबुक, भारतीय पासपोर्ट, यापैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत जरूर असावे असाही संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना व नातेवाईकांना पत्राद्वारे दिलेला आहे.

## कृष्णराज महाडिक हाती धनुष्यबाण घेण्याची शक्यता

**कोल्हापूर :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर असतानाच राज्यातल राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सध्या पक्षफोडीचं राजकारण वेग धरत असतानाच उमेदवारीसाठी नेतेमंडळी आणि काही मोठे चेहरेच प्रस्थापितांचे पक्ष सोडत जिथं उमेदवारीची संधी आहे अशा पक्षांची साथ घेताना दिसत आहेत. किंबहुना अनेकांनी नवी सुरुवात करत निवडणुकीआधी पक्षप्रवेशही केले आहेत. तिथं कोकणात निलेश राणे यांनीही शिंदेंच्या शिवसेनेच प्रवेश केला असतानाच इथं महायुतीत आणखी एका पक्षांतराच्या चर्चेनं जोर धरला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार महायुती मध्ये पुन्हा कोकण पॅटर्न लागू होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कोल्हापूर उत्तर मतदार संघासाठी जोरदार रस्सी खेच सुरु असल्यामुळं (BJP) भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याची माहिती आहे.



# नगर जिल्ह्यातील विखे-थोरातांचा वाद विकोपाला...

## पातळी सोडून टीका करणाऱ्यांवर कारवाई करा

### जयश्री थोरातांची मागणी




प्रतिनिधी
■ संगमनेर

वसंत देशमुख यांना शिक्षा व्हायला हवी, मुलींबद्दल असे बोलले जात असेल तर मुलींना राजकारणात का यावे असा सवाल बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांनी म्हटले आहे. वसंत देशमुख फरार झाले आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी माध्यमांशी बोलताना केली आहे.

दरम्यान जयश्री थोरात पुढे बोलताना म्हणाल्या की, सुजय विखेंकडून माझ्यावर पातळी सोडून टीका करण्यात आली असा आरोप जयश्री थोरातांनी केली आहे. मला जर रात्रभर पोलिस स्थानकांच्या बाहेर उभे रहावे लागेत असेल तर पोलिसांवर किती दबाव होता हे लक्षात घ्या, असे म्हणत त्यांनी विखेंवर निशाणा साधला आहे.

जयश्री थोरात म्हणाल्या की, जे काही काल घडलं ते कुणालाही न शोभणारं, अत्यंत वाईट आहे... जर महिलांनी राजकारणात यायचं असेल, तर असं बोलल्यास कोण येणार? मी असं काय केलं होतं की, माझ्याबद्दल एवढं वाईट बोलले? जे बोलले ते त्यांच्या वयाला शोभणारं आहे का? विरोधाला पण एक पातळी असते, नातीच्या वयाच्या मुलीबद्दल असं बोलणं शोभतं का?

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांची कन्या आणि बहिणीने पूर्ण रात्र पोलिस ठाण्यासमोर बसून काढली. वसंतराव देशमुख यांच्या वक्तव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीनंतर चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

संगमनेरमधील धांदरफळमध्ये माजी खासदार, भाजपचे नेते सुजय विखे पाटील यांची सभा झाली. या सभेत भाजपचे नेते वसंतराव देशमुख यांनी जयश्री थोरात यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केलं आहे. त्यानंतर संगमनेर मतदारमध्ये तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. गाड्यांची तोडफोड करण्यात आली आहे. तर जयश्री थोरात यांनी या विधानाचा निषेध केला आहे. रात्रभर त्या पोलिस स्टेशनबाहेर बसून होत्या.

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ खुर्द बाजारतळ येथे माजी खासदार सुजय विखे यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन केले होते. या सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या वसंतराव देशमुख यांनी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने गावातील संतप्त महिलांनी ही सभा उधळून लावली. यानंतर गोंधळ झाला. यानंतर संतप्त जमावाने दगडफेक, जाळपोळ केली.

## सुजय विखेंचा आज मोर्चा

■ संगमनेर

महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची वाहने फोडून,जाळून दहशतीचे खरे दर्शन राज्याला घडविले आहे. तालुक्यातील आमच्या कार्यकर्त्यांवर असाच अन्याय कराल तर तुमची दहशत मोडून काढण्यासाठी जनता अशीच रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही. या घटनेनंतर काँग्रेस कार्यकर्त्यावर गुन्हे दाखल करा या मागणीसाठी रविवार (27 ऑक्टोबरला) संगमनेर येथे निषेध मोर्चा काढणार आहे. अशी माहिती शनिवारी दुपारी पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात डॉ.सुजय विखे यांनी दिली. धांदरफळ येथील सभेनंतर झालेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी संगमनेर आणि राहाता तालुक्यातील महायुतीच्या पदाधिका-यांनी बोलविलेल्या सभेत डॉ.सुजय विखे बोलत होते.

## शिर्डी मतदारसंघातील दडपशाही, हुकुमशाही येथे चालणार नाही

### डॉ. सुधीर तांबेंचा इशारा

प्रतिनिधी
■ अहिल्यानगर

संस्कृत राजकारण ही आपली परंपरा आहे. मात्र कुणी अस्मितेला आणि स्वाभिमानाला धक्का लावत असेल तर संगमनेर तालुका हे सहन करणार नाही. लोकशाही आहे मते मांडण्याचा अधिकार आहे.मात्र शिर्डी मतदारसंघातील दडपशाही आणि हुकूमशाही येथे चालणार नाही, असा आरोप माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी शनिवारी केला.

संगमनेर येथील घुलेवाडी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे महिलांचा अपमान करणारे वसंत देशमुख व सुजय विखे यांना तातडीने अटक करावी,या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, राहाता मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार



प्रभावती घोगरे, हेमंत ओगले, दुर्गाताई तांबे, डॉ जयश्री थोरात,उत्कर्षा रुपवते आदी यावेळी उपस्थित होते.युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांच्या बद्दल वक्तव्य करणारे वसंत देशमुख यांना तातडीने अटक करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

भाऊसाहेब खासदार वाकचौरे म्हणाले, थोरात परिवार हा सुसंस्कृत परिवार आहे. या परिवाराचा सर्व राज्य आदर करतो आहे. परंतु वाईट प्रवृत्ती काय असते ती आता संगमनेर ने नव्हे तर जिल्ह्याने अनुभवली आहे. प्रभावती घोगरे म्हणाल्या, ही वाईट संस्कृती राहता तालुक्याला माहित आहे. विरोधी बोलले की तंगड्या तोडल्या जातात. महिलांबद्दल इतके वाईट बोलताना यांना लाज कशी वाटत नाही.

## हल्ला करणे हाच हल्लेखोरांचा प्रयत्न होता

### राजकीय षडयंत्र असल्याचा मंत्री विखेंचा आरोप

प्रतिनिधी
■ संगमनेर

संगमनेरमधील हिंसाचारावर माजी खासदार सुजय विखे यांनी आपल्यावर पूर्वनियोजित हल्ल्याचा कट असल्याचा आरोप केल्यानंतर त्यांचे वडील भाजप नेते मंत्री राधाकृष्ण विखे यांनी देखील या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देत मोठा आरोप केला. 'हा सर्व राजकीय षडयंत्राचा भाग असून, हल्ला करणे हाच हल्लेखोरांचा प्रयत्न होता', असा आरोप मंत्री विखे यांनी केला आहे.

भाजपचे (BJP) माजी खासदार सुजय विखे संगमनेर विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. यासाठी भाजपकडे त्यांनी उमेदवारी मागितली असून, त्यांनी संगमनेर मतदारसंघात दौरे वाढवले आहे. यातून काँग्रेस नेते माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात आणि सुजय विखे यांच्या राजकीय संघर्ष पेटला आहे. दोघं एकमेकांवर टीका करत आहेत.



संगमनेरमधील धांदरफळ इथल्या सुजय विखेंच्या सभेत त्यांचे समर्थक वसंतराव देशमुख यांनी जयश्री थोरात यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले. यानंतर संगमनेरमध्ये थोरात आणि काँग्रेसच्या समर्थकांनी विखेंची सभा उधळून लावली. याचे पडसाद संगमनेर शहरात उमटले आणि हिंसाचार भडकला. वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली. या सर्व घटनेवर माजी खासदार सुजय विखे यांनी विधानाचा निषेध करताना, आपल्यावर पूर्वनियोजित हल्ल्याचा कट होता, असा गंभीर आरोप केला.

## सुजय मेलेल्या आईचं दूध प्यायलेला नाही

### संगमनेरमधील राड्यानंतर शालिनी विखे आक्रमक

प्रतिनिधी
■ शिर्डी

माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या कार्यक्रमात भाजप नेत्याने अश्लाघ्य भाषेत माजी मंत्री आणि काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्यावर टीका केली. कार्यक्रमानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुजय विखे यांच्या कार्यकर्त्यांच्या गाड्यांची तोडफोड केली. तसेच गाडी पेटवण्यात देखील आली. यावरुन आता सुजय विखे आणि त्यांच्या मातोश्री शालिनी विखे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ गावात सुजय विखे यांनी युवा संकल्प मेळावा आयोजित केला होता. या



मेळाव्यात त्यांचे समर्थक वसंतराव देशमुख यांनी आपल्या भाषणात जयश्री थोरात यांच्याबद्दल काही आक्षेपार्ह वक्तव्ये केली. सुजय विखे मंचावर असतानाच ते जयश्री थोरात यांच्याबद्दल अपमानास्पद शब्दांत टीका करत होते. वसंतराव देशमुख्यांच्या वक्तव्यामुळे संगमनेर तालुक्यात तणाव निर्माण झाला. त्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते व थोरात समर्थकांनी सुजय विखेंचे बॅनर फाडून आणि त्यांच्या गाड्या फोडून निषेध व्यक्त केला.

कालच्या सभेला मिळालेला प्रतिसाद पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून हा सुजय विखे विरोधात जीवे मारण्याचा पूर्व नियोजित कट होता, अशी प्रतिक्रिया शालिनी विखे पाटील यांनी दिली आहे. तसेच वसंतराव देशमुख यांच्या चुकीच्या वक्तव्याचा आपण निषेध केलेलाच आहे. पण सुजय विखेसुद्धा मेलेल्या आईचं दूध प्यायलेला नाही, जशेस तसे उत्तर देईल, असंही शालिनी विखे म्हणाल्या.

### म ह त्त्वा चे

#### ड्रग्सची विक्री करणाऱ्या दोघांना अटक

**नागपूर :** नागपूर क्राइम ब्रांच युनिट दोनचा पथकाची कारवाई ड्रगची विक्री करणाऱ्या दोघांना क्राइम ब्रांच युनिट दोनचा पथकाने अटक केली. आकाश खाडेकर आणि शरद भोयर, अशी अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्यांच्याकडून तब्बल एक किलो 900 ग्राम इतका गांजा जप्त करण्यात आलाय. नागपुरातील काटोल मार्गावर असलेल्या पोलीस मोटार परिवहन विभागाच्या वर्कशॉप जवळच हे गांजा होते. अंधारात रात्र होताच ड्रगची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याआधारे गस्तीवर असताना सापळा लावून दोघेही त्या ठिकाणी आले असता ताब्यात घेतले. त्यांची झाडा झडती घेतली असता त्यांच्याकडून तब्बल दोन किलोच्या घरात गांजा जप्त करण्यात आला.

#### मुंबई-चिपी विमान सेवा बंद

**वेंगुर्ला :** मुंबई ते चिपी विमानसेवेला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत होता. अलायन्स एअर या कपंनीच्या अनियमित सेवेमुळे ही विमानसेवा टीकेचे लक्ष बनली होती. ३ वर्षांपूर्वी मुंबई ते चिपी आणि चिपी ते मुंबई अशी विमानसेवा सुरू करण्यात आली होती. पण ही सेवा रडतखडतच सुरु होती. अखेर २६ ऑक्टोबरपासून मुंबई-चिपी आणि चिपी-मुंबई ही विमानसेवा बंद होत आहे. ही सेवा तीन वर्षांसाठी करार पद्धतीने सुरू केली होती. ही मुदत आज २६ ऑक्टोबर रोजी संपणार आहे. त्यामुळे या प्रवासाची २६ तारखेपासूनची तिकीट विक्री बंद होणार आहे. दरम्यान, चिपी विमानतळावरून फ्लाय ९१ ची पुणे, बंगळुरू आणि हैदराबाद ही सेवा सुरु आहे.

## प्रकाश आंबेडकरांना पुतण्या देणार आव्हान?

### राजरत्न आंबेडकर मनोज जरांगेंच्या मदतीने उतरणार निवडणुकीच्या मैदानात



प्रतिनिधी
■ जालना

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्याच्या राजकारणात मोठ्या उलथापालथी सुरू आहेत. राज्यातील अनेक मतदारसंघात कौटुंबिक लढती होत आहेत. त्यातच आता बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर यांनीही विधानसभेच्या निवडणुकीत उडी मारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी यासंबंधी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्याशी आघाडी करण्याचे संकेत दिलेत. असे झाले तर ते आपले चुलते तथा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांना आव्हान देतील.

राजरत्न आंबेडकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यात राजरत्न आंबेडकर यांनी राज्यातील 29 राखीव जागा लढण्यावर चर्चा झाली. राजरत्न स्वतःही निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. पण ते नेमक्या कोणत्या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार हे पुढील 2-3 दिवसांत ठरणार आहे.

## येवल्यात भुजबळांविरोधात 'मराठा कार्ड'

प्रतिनिधी
■ नाशिक

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील सर्वच घटक पक्षांकडून अनेक मतदारसंघात आता आपल्या उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. येवला मतदारसंघ सध्या चांगलाच चर्चेत आहे. येवला हा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात पुन्हा एकदा छगन भुजबळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या पहिल्याच यादीमध्ये या मतदारसंघातून भुजबळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर छगन भुजबळ यांच्याविरोधात महाविकास आघाडी कोणाला उमेदवारी देणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर येवल्यामधून महाविकास आघाडीनं आपला उमेदवार जाहीर केला आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून आपल्या उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये येवला मतदारसंघाचा देखील समावेश आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून येवल्यामधून मणिकराव शिंदे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता या मतदारसंघामध्ये शिंदे आणि भुजबळ यांच्यामध्ये काटे की टक्कर होण्याची शक्यता आहे.

## ओव्हरटेक करण्याच्या वादात तरुणाची हत्या

प्रतिनिधी
■ पुणे

दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या वादातून एका तरुणाचा तीन अल्पवयीन मुलांनी निर्घुन खून केला. धारदार हत्याराने तरुणावर तब्बल ३५ वार करण्यात आले. ही घटना हिंगणे खुर्द येथील गणेश कॉलनी येथे घडली. याप्रकरणी सिंहगड पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. तर एकाचा शोध सुरु आहे.

अभय मारुती सुर्यवंशी (२०, रा.गणेशनगर कॉलनी, पुणे) असे मृताचे नाव आहे. तर त्याचा खून करणारे तीन आरोपी हे १६ ते १८ वर्षे वयोगटातील आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत अभय हा एका स्वीट मार्टमध्ये काम करतो. त्यानी आरोपींच्या दुचाकीला त्याची दुचाकीने ओव्हरटेक केले होते. याचा राग मनात धरुन तीन आरोपींनी धारदार शस्त्राने त्याच्यावर तब्बल ३५ वार केले. गंभीर जखमी झालेल्या अभयला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्यास मृत घोषित केले गेले. यानंतर सिंहगड पोलिसांच्या पथकानी शनिवारी रात्री दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. त्यांनी खुनाची कबुली दिली आहे. त्यांचा एक साथीदार मात्र शहराबाहेर पसार झाला आहे. त्याच्या शोधार्थ एक पथक रवाना करण्यात आले आहे. यातील एका मुलावर दोन चार दिवसांपुर्वीच खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात त्यास बाल न्यायालयात हजर करण्यात आले होते. यानंतर दोनच दिवसांत त्याने हा गंभीर गुन्हा केला.

## धावत्या बसने अचानक घेतला पेट

### पुणे-बंगळुरू महामार्गावरील थरारक घटना

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

बेळगावहून पुण्याला निघालेल्या एका खासगी प्रवासी बसला अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना घडलीय. या घटनेत एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे-बंगळुरू महामार्गावर कोल्हापुरातील गोकुळ शिरगाव ते उजळाईवाडीदरम्यान शुक्रवारी मध्यरात्री 1 वाजेच्या सुमारास हा 'बर्निंग बस'चा थरार घडला. या घटनेची नोंद गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

खासगी कंपनीची प्रवासी बस बेळगावहून रात्री नऊ वाजेच्या सुमारास निघाली होती. सुमारे 30 प्रवासी असलेली ही बस गोकुळ शिरगाव येथील मयूर पेट्रोल पंपाजवळ आल्यानंतर अचानक इंजिननं पेट घेतला. इंजिनला आग लागल्याचं पाहताच चालक आणि वाहकानं घटनास्थळावरुन पलायन केलं. बसमधील प्रवासी गडबडीनं खाली उतरले. मात्र, एक प्रवासी झोपेत असल्यानं तो बसमध्येच अडकला. त्यामुळं आगीत होरपळून त्याचा मृत्यू



झाला. काही वेळातच संपूर्ण बसनं पेट घेतला. बघता बघता आगीनं रौद्ररुप धारण केलं. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह गोकुळ शिरगाव पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन अग्निशमन दलाला पाचारण केलं. कोल्हापूर मनपाच्या अग्निशमन दलानं ही आग आटोक्यात आणली. दरम्यान, अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळं राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही तास खोळंबली होती.

इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळं आग लागल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केलाय. गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्याचे दिगंबर गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याच्या सूचना दिल्यात. तर सध्या पोलीस चालक आणि वाहकाचा शोध घेत आहेत.

## नाशिकमध्ये माय-लेकासह मामाचा नदीत बुडून मृत्यू

### दिवाळीच्या तोंडावर कुटुंबावर शोककळा

प्रतिनिधी
■ नाशिक

नाशिकच्या नांदगावमधून दुर्दैवी घटना समोर आली आहे. नाशिकच्या नांदगावमध्ये तिघांचा नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर दुर्दैवी घटना घडल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकच्या नांदगाव तालुक्यातील माय-लेकरासह मामाचा नदीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नाशिकच्या नांदगाव तालुक्यातील बाणगंगा नदीजवळ ही घटना घडली आहे. एकाच घरातील तिघांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

बाणगंगा नदीजवळ पाण्यात मेंढ्या धुण्यासाठी मुलाला पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे मुलगा पाण्यात बुडू लागला. त्यावेळी त्या मुलाची आई आणि मामा त्यास वाचवण्यासाठी गेले. त्यावेळी दोघांनाही पाण्याचा अंदाज न आल्याने तिघांचा मृत्यू झाला आहे. या दुर्दैवी घटनेत अंबादास केरुबा खरात (वय २९), इंदुबाई बापू विटणर ( वय३५) आणि वाल्मीक बापू विटणर (वय १५ ) अशी तिघांची नावे आहेत. तिनही मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. या तिघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले.

## शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री असूनही मराठा आरक्षण दिले नाही

### केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची टीका

प्रतिनिधी
■ पुणे

मराठा आरक्षणासाठी अनेकवेळा आंदोलन झाली पण कोणी मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. आज आरक्षणाचा वापर राजकारणासाठी केला जात आहे. जेष्ठ नेते शरद पवार राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री असूनही त्यांनी मराठा आरक्षण दिले नाही. सन २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस सरकार मध्ये आल्यावर त्यांनी आरक्षण प्रथम दिले आणि ते न्यायालयात टिकेल. ओबीसी हक्क अबाधित ठेवून महायुती सरकारच मराठा आरक्षण दीर्घकालीन देऊ शकेल. मराठा नेते मनोज जरांगे यांच्या मागण्या बाबत सरकार गांभीर्याने सूक्ष्म विचार करत आहे. सर्वांना




न्याय देण्याची आमची भूमिका आहे. राज्य सरकारच्या अनेक योजना लोकउपयोगी असून कोणी किती जात, धर्म अजेंडा चालवला तरी जनता प्रगतीला मत देईल असे मत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी ज्येष्ठ नेते माधव भंडारी, राष्ट्रीय प्रवक्ते के. के. उपाध्याय, मुख्य प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्याय, अध्यक्ष धीरज घाटे, संदीप खर्डेकर, अमोल कविटकर, संजय मयेकर, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर यांची प्रमुख उपस्थित होती.

मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले की, भाजपच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात मीडिया सेंटर निर्मिती करण्यात येत आहे. आज पश्चिम महाराष्ट्रसाठी मीडिया सेंटर पुण्यात सुरू होत आहे. विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणून तयारी करण्यात येत आहे. पश्चिम महाराष्ट्र मध्ये ५८ पैकी ४२ जागा आमच्या असून त्या जागा पेक्षा अधिक जागा आम्ही पुन्हा जिंकू असा विश्वास आहे. राज्यासाठी केंद्र सरकारने दहा लाख कोटी रुपये विकास कामासाठी दिले असून राज्यासाठी एक लाख कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम केले. आमच्या काळात लोकउपयोगी योजना आघाडी सरकारने बंद केल्या त्यामुळे लोकांना त्याबाबत समजून चुकले ते योजना बंद करणारे सरकार होते. युती सरकार काळात पुन्हा विकास होऊ लागला आहे. पुढे बोलताना मुरलीधर मोहोळ म्हणाले, साखर कारखानाना सात हजार कोटी रुपये मदत केली गेली आणि दहा हजार कोटी आयकर विभागाचे माफ करण्यात आले आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र मध्ये प्रवास करताना सकारात्मक वातावरण दिसून येत आहे. पुन्हा एकदा नागरिक आमच्यावर विश्वास ठेवतील. परदेशी गुंतवणूक सर्वाधिक देशात महाराष्ट्र मध्ये आलेली आहे.

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता महेंद्र उबाळे यांची मनपाचे नगर अभियंता म्हणून नियुक्ती झाली.त्यानिमित्ताने म्युनिसिपल मजदूर संघाच्या वतीने मुख्य अभियंता महेंद्र उबाळे यांची सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.यावेळी संघाचे उपाध्यक्ष दिलीप थोरावडे, सरचिटणीस प्रकाश कमलाकर जाधव, उपाध्यक्ष सुधाकर गायकवाड, जेष्ठ चिटणीस संजय कापसे, उपाध्यक्ष रुपेश पुरळकर, खजिनदार सुनील कांबळे, चिटणीस नितीन कांबळे, संजय जाधव व अनिल पाटेकर आदि मान्यवर उपस्थित होते.



# भारताने 12 वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली

## २४ वर्षांत टीम इंडियावर तिसऱ्यांदा ओढवली नामुष्की

## मायदेशात गमावले सलग दोन कसोटी सामने

प्रतिनिधी
■ पुणे

न्यूझीलंडने पुण्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यांत ११३ धावांनी विजय मिळवत तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. किवी संघाने बंगळुरू येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात आठ गडी राखून विजय मिळवला होता. भारतीय संघाकडून पुनरागमन करण्याच्या मोठ्या अपेक्षा होत्या, परंतु रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाला ते करण्यात अपयश आले. या सामन्यात न्यूझीलंडने विजयासाठी ३५९ धावांच्या लक्ष्याला दिले होते. प्रत्युत्तर देताना टीम इंडिया दुसऱ्या डावात २४५ धावांवर आटोपली आणि सलग दुसरा सामना गमावत २४ वर्षांत तिसऱ्यांदा लाजिरवाणा विक्रम केला.

या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात २५९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव १५६ धावांवर आटोपला. यानंतर १०३ धावांच्या आघाडीनंतर न्यूझीलंडने दुसऱ्या डावात २५५ धावा केल्या आणि एकूण ३५८ धावांचे लक्ष्य दिले. या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाकडून यशस्वी जैस्वालने सर्वाधिक ७७ धावा केल्या आणि रवींद्र जडेजाने ४२ धावांची खेळी केली. या दोघांशिवाय कोणताही फलंदाज २५ हून अधिक धावा करू शकला नाही. न्यूझीलंडसाठी मिचेल सँटनरने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात सहा अशा एकूण १४ विकेट्स घेतल्या.




### भारतीय संघ सलग दोन कसोटीत पराभूत

*भारताने मायदेशात सलग दोन कसोटी गमावल्या आहेत. २०१२ नंतर टीम इंडियाने मायदेशात सलग दोन कसोटी गमावण्याची ही पहिलीच वेळ आहे. २०१२ मध्ये, इंग्लंडने वानखेडेवर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटीत आणि ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटीत चार सामन्यांच्या मालिकेत भारताचा पराभव केला हो. २००० नंतर २४ वर्षात टीम इंडियाने घरच्या मैदानावर सलग दोन कसोटी गमावण्याची ही तिसरी वेळ आहे. न्यूझीलंड आणि इंग्लंडच्या आधी दक्षिण आफ्रिकेने ही कामगिरी केली होती. २००० मध्ये दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताचा २-० असा पराभव झाला होता. त्यावेळी आफ्रिकन संघाने वानखेडे आणि चिन्नास्वामी स्टेडियमवर टीम इंडियाचा पराभव केला होता.*

### १२ वर्षांनंतर मायदेशात कसोटी मालिका गमावली

*भारतीय संघाने तब्बल १२ वर्षांनंतर मायदेशात कसोटी मालिका गमावली आहे. यासह घरच्या भूमीवर सलग १८ कसोटी मालिका जिंकल्यानंतर विजयी मालिका खंडित झाली. शेवटच्या वेळी टीम इंडियाला २०१२-१३ मध्ये चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत इंग्लंडकडून २-१ ने पराभूत केले होते. त्यानंतर भारताने सलग १८ मालिका जिंकल्या. मात्र, आता न्यूझीलंडने टीम इंडियाला पराभूत करून ही विजयाची मालिका खंडित केली आहे. किवी संघ भारतीय भूमीवर एवढी प्रभावी कामगिरी करेल, असे कुणालाही वाटले नव्हते. पहिली कसोटी जिंकून न्यूझीलंडने ३६ वर्षांनंतर भारतात कसोटी सामना जिंकला होता. आता प्रथमच त्याने भारतात कसोटी मालिका जिंकली आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पहिली कसोटी १९५५ मध्ये खेळली गेली आणि दोन्ही देशांच्या ६९ वर्षांच्या कसोटी क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच न्यूझीलंड संघाने भारतीय भूमीवर कसोटी मालिका जिंकली.*

# पाकिस्तानने 2021 नंतर घरच्या मैदानावर मालिका जिंकली

## इंग्लंडचा 9 गडी राखून पराभव; साजिद खानने सामन्यात 10 बळी घेतले




वृत्तसंस्था
■ रावळपिंडी

रावळपिंडी कसोटीत पाकिस्तानने इंग्लंडचा ९ गडी राखून पराभव केला. यासह पाकिस्तानने २०२१ नंतर (२-१) घरच्या मैदानावर मालिका जिंकली आहे.

सामन्याच्या तिसऱ्या दिवशी इंग्लंडचा दुसरा डाव 112 धावांवर आटोपला. संघाने पाकिस्तानला 36 धावांचे लक्ष्य दिले. जे संघाने 3.1 षटकात एक विकेट गमावून पूर्ण केले. कर्णधार शान मसूदने 6 चेंडूत 23 धावांची खेळी खेळली. त्याने षटकार मारून सामना जिंकला.

शनिवारी इंग्लंडने कालच्या स्कोअर 24/3 च्या पुढे खेळण्यास सुरुवात केली. संघाकडून जो रूटने 33 आणि हॅरी ब्रूकने 26 धावा केल्या. पाकिस्तानकडून साजिद खानने सामन्यात 10 विकेट घेतल्या. तर नोमान अलीने 9 विकेट घेतल्या. सौद शकीलने १३४ धावांची खेळी केली.

तिसऱ्या दिवशी पाकिस्तानच्या गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी केली. डावखुरा फिरकी गोलंदाज नोमान अलीने 5 बळी घेतले. त्याने जॅक क्रॉलीला 2 धावांवर, ऑली पोपला 1 धावांवर, जो रूटला 33 धावांवर, हॅरी ब्रूकला 26 धावांवर आणि कर्णधार बेन स्टोक्सला 3 धावांवर बाद केले. नोमनने 18.2 षटकात 42 धावा देत 6 बळी घेतले. फिरकीपटू साजिद खानने 4 बळी घेतले. फिरकीपटू साजिद खानने 18 षटकांत 69 धावा देत 4 बळी घेतले.

### दुसऱ्या दिवसाचा खेळ

तिसऱ्या कसोटीत पाकिस्तानने पुनरागमन केले आहे. रावळपिंडीत तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडने दुसऱ्या डावात 3 गडी गमावून 24 धावा केल्या होत्या. सौद शकील, नोमान अली आणि साजिद खान यांनी पाकिस्तानला कठीण परिस्थितीतून बाहेर काढून मजबूत स्थितीत आणले आहे. पाकिस्तानकडून आत्तापर्यंत नोमानने 2 तर साजिदने 1 बळी घेतला आहे.

पाकिस्तानने पहिल्या डावात 344 धावा केल्या होत्या. सौद शकीलने 233 चेंडूत 134 धावांची शानदार खेळी केली. नोमान अलीने 45 धावांची तर साजिद खानने 48 धावांची नाबाद खेळी खेळली. नोमानने पहिल्या कसोटीत दोन्ही डावात 11 आणि साजिद खानने 9 विकेट घेतल्या होत्या. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तानचा कर्णधार शान मसूद कालच्या धावसंख्येत केवळ 3 धावा जोडू शकला आणि 26 धावांवर बाद झाला. यानंतर सऊद शकील आणि यष्टिरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान यांनी ही खेळी सांभाळली. दोघांनी मिळून पाचव्या विकेटसाठी 52 धावांची भागीदारी केली. याआधी शान मसूद आणि शकील यांनी मिळून ५३ धावा केल्या होत्या.

सौद शकीलने शानदार फलंदाजी करत शतक झळकावले. त्याने 134 धावांची खेळी खेळली. शकीलने या डावात 5 चौकार मारले. शकीलने नोमान अली आणि साजिद खानसोबत शेवटच्या 2 विकेटसाठी पन्नासची भागीदारी केली. त्याने नोमनसोबत आठव्या विकेटसाठी 151 चेंडूत 88 धावांची भागीदारी केली. यानंतर त्याने साजिद खानसोबत नवव्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली.

## इमर्जिंग आशिया कप 2024

# भारत उपांत्य फेरीत पराभूत अफगाणिस्तान 20 धावांनी विजयी




वृत्तसंस्था
■ मस्कत

भारत-अ संघ इमर्जिंग आशिया कप 2024 मधून बाहेर पडला आहे. अफगाणिस्तान अ संघाने शुक्रवारी मस्कत येथील अल अमिराती क्रिकेट मैदानावर झालेल्या उपांत्य फेरीत भारताचा २० धावांनी पराभव केला.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने 20 षटकांत 4 गडी गमावून 206 धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ 20 षटकांत 7 गडी गमावून केवळ 186 धावा करू शकला. आता 27 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात अफगाणिस्तान-अ संघाचा सामना श्रीलंका-अ यांच्याशी होईल. दुसऱ्या उपांत्य फेरीत श्रीलंका-अ ने पाकिस्तान-अ चा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

रमणदीपने 64 धावा केल्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने सातत्याने विकेट गमावल्या. एकेकाळी संघाची धावसंख्या पाच गड्यांच्या मोबदल्यात 100 धावा होती. येथून रमणदीप सिंगने डावाची धुरा सांभाळत वेगवान फलंदाजी केली. मात्र त्याची खेळी भारताला सामना जिंकून देऊ शकली नाही. रमणदीपने 34 चेंडूंत 8 चौकार आणि 2 षटकारांसह 64 धावा केल्या. आयुष बडोनीने 31 आणि निशांत सिंधूने 23 धावांचे योगदान दिले. अफगाणिस्तान-अ कडून अल्लाह गझनफर आणि अब्दुल रहमान यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

### ● अफगाणिस्तानचा संघ अंतिम सामना श्रीलंकेसोबत खेळणार

अफगाणिस्तानने दोन अर्धशतके झळकावली अफगाणिस्तान-अ संघाने प्रथम फलंदाजी करताना झुबैद अकबरी आणि सिदीकुल्लाह अटल यांनी मिळून पहिल्या विकेटसाठी 137 धावा केल्या. अटलने 52 चेंडूत 83 धावा केल्या. तर अकबरीने 41 चेंडूत 64 धावांची खेळी केली. करीम जनातनेही 41 धावांचे योगदान दिले. भारत अ संघाकडून रसिक सलामने सर्वाधिक ३ बळी घेतले. ब गटात भारत अव्वल स्थानावर राहिला भारत-अ संघाने गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकले आणि 6 गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पाकिस्तान आणि श्रीलंकेने प्रत्येकी दोन विजेतेपद पटकावले एसीसी पुरुषांच्या उदयोन्मुख आशिया चषक स्पर्धेचा हा सहावा हंगाम आहे. यावेळी सहा संघ सहभागी झाले होते. अ गटात बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान आणि हाँगकाँगचा समावेश आहे. तर ब गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएई यांचा समावेश आहे. पाकिस्तान आणि श्रीलंकेने प्रत्येकी दोन विजेतेपद पटकावले आहेत. तर भारताने एकदाच विजय मिळवला आहे. भारताने 2013 मध्ये पाकिस्तानचा पराभव करून विजेतेपद पटकावले होते.




**मुंबई :** गोरेगाव (पूर्व) येथील नेस्को एक्जीबिशन सेंटरमध्ये आंतरराष्ट्रीय पुष्प प्रदर्शन भरविण्यात आले आहे.या प्रदर्शनात, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने पुष्परचनेत महाराष्ट्राचा नकाशा आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर मतदान करण्याविषयी संदेश साकारुन अनोखी जनजागृती केली आहे.

# भरल्या घरच्या महाविकास आघाडीला दृष्ट...

प्रविण पुरो


भरल्या घराला दृष्ट लागायला वेळ लागत नसते असं म्हणतात. तशी राज्यात निर्माण झालेल्या भरल्या घरच्या महाविकास आघाडीलाही अशीच दृष्ट लागली आहे. डोक्यात अहंकार गेला की जे व्हायचं ते महाविकास आघाडीच्या नेत्यांचं विशेषत: शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचं झालं आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीला सामोरं जाण्यासाठी सज्ज ठरू पाहत असलेली महाविकास आघाडी अहंकाराने अवदसेच्या आहारी गेली आहे. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या अभूतपूर्व यशाने हुरळून जाऊन काहीही केलं आणि कसंही वागलो तरी लोकं आपल्यालाच मतं देतील, असल्या स्वप्नात आघाडीचे नेते आहेत. त्यातल्या त्यात उद्धव ठाकरे यांच्या एकूणच दावेगिरीने महाविकास आघाडीला आलेली बरकत ते घालवायला निघालेत की काय, या शंकेला वाव आहे. लोकसभा निवडणुकीवेळी सांगलीच्या एका जागेसाठी केलेल्या हट्टानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीतून उद्धव ठाकरे काहीच शिकायला मागत नाहीत, असं दिसतं. सांगली हा परंपरागत काँग्रेसचा बालेकिल्ला. या बालेकिल्ल्यात वसंतदादांचे नातू विशाल हे काँग्रेसचे उमेदवार होते. मात्र कोणीतरी चंद्रहार पाटील पेहलवान आपल्याकडे आल्याचा आव आणत त्या जागेसाठी उद्धव यांनी आकाशपाताळ एक केलं. संजयकाका या दोनवेळ निवडून आलेल्या उमेदवारापुढे महाविकास आघाडीतील अशी फूट भाजपला वर्णीच होती. मात्र याही परिस्थितीत संजयकाका यांचा पराभव करत विशाल एक लाख मतांच्या फरकाने मोठ्या दिमाखात विजयी झाले. सांगलीच्या एका जागेचा परिणाम कुटुंबप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे विधानसभेवेळी विचारात घेतील, असं वाटत होतं. पण अहंकाराने त्यांना इतकं पछाडलं की होऊ घातलेल्या निवडणुकीत सेनेच्या वाट्यातील जवळपास 20 जागा ते हातचे घालवायला निघालेत असं दिसतं.



विधानपरिषदेच्या निवडणुकीत शेकापच्या ताब्यातील म्हणजे जयंत पाटील यांच्याकडे असलेल्या एका जागेवर मिलिंद नार्वेकर यांना उभं करून उद्धव ठाकरे यांनी आघाडीत पहिली बिघाडी केली. एक जागा मिळवली खरी. पण त्यामुळे आघाडीची गणितं चुकली. दाखले लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या अनंत गितेंचे दिले जातात. गितेंच्या रायगड, रत्नागिरी, मावळा या मतदारसंघात शिवसेनेच्या उमेदवारांचा पराभव का झाला याची चिकित्सा शिवसेनेने आजही केलेली दिसत नाही. सहकारी पक्षांना दोष देण्यापेक्षा पैशाच्या पोतड्यांपुढे तिन्ही उमेदवारांनी टाकलेली नांगी आणि मातोश्रीने वर केलेले हात याचा विचार जिथे केला जात नाही तिथे वास्तवाची चर्चाच खुजी ठरते. अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी जिगरी दोस्ती राखणारे नार्वेकर निवडून आले म्हणून शिवसेनेने खूप काही कमावलं असं नाही. उलट 13 आमदारांचा पाठिंबा जयंत पाटील यांच्या मागे उभा करणाऱ्या शरद पवारांचा आपण अवमान करतो त्यांचा विश्वास गमावतो याचंही भान उद्धव ठाकरेंना राहिलं नाही.

एकाच घरात पाच भाऊ नांदत असताना त्यांच्यात दुजाभाव करणं हे अप्पलपोटी लक्षण मानलं जातं. घरात कलह होतो आणि कुटुंब असं उघडं पडतं. हे होता नये, यासाठी पवारांनी केलेले फोन जिथे घेतले जात नाहीत, तिथे इतरांच्या मानमरातबाचा विषयच निकाली निघतो. महाविकास आघाडीला आजवर मदत करत आलेल्या लहान गटांना विश्वासात न घेता त्यांच्याच जागांवर परस्पर उमेदवार उभे करून उद्धव ठाकरे यांनी आगीत तेल ओतण्याचं पाप केलं आहे. यामुळे शेकापनंतर आता समाजवादी पार्टी आणि कम्युनिस्ट पक्षाने स्वत:ची चूल निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचे थेट परिणाम शिवसेनेच्या उमेदवारांच्या पराभवात होतील, हे सेनेच्या पक्षप्रमुखांना कळत कसं नाही? विषय होता 12-15 जागांचा. इतकाही उदारपणा दाखवला जाणार नसेल तर प्रत्येकाला आपला पक्ष प्यारा आहेच, तो आपल्या पक्षाची ताकद दाखवायला क म ी करणार थोडंच? पाच सात हजार मतंही अशावेळी पराभवाची पेरणी करत असतात. याला उपद्रवमुल्य म्हणतात. ते टाळणं ही तिन्ही घटक पक्ष प्रमुखांची जबाबदारी होती. ती सेनेने अव्हेरली.

मुंबईतल्या मानखूर्द आणि भिवंडी या दोन जागांवर समाजवादी पार्टीचे विद्यमान आमदार आहेत. त्याही जागा सोडण्याची तयारी आघाडीतल्या बड्या पक्षांची नाही. परभणी, पंढरपूर, निफाड, रामटेक, अकोला पूर्व, पाटण, ऐरोली, नाशिकमध्य, भूम, वणी, गोवराई अशा 12 जागांवर आघाडीतील घटकपक्षाचा दावा असताना उद्धव यांनी तिथेही उमेदवार जाहीर करून आघाडीला डच्चू मारला. नांदेड येथील लोहा, सांगोल्यातील गणपतराव देशमुखांच्या विक्रमी विजयाच्या जागांवर आणि अलिबाग या तीन जागा शेकापसाठी तुलबल्य असताना त्या जागांवरही स्वत:चे उमेदवार देत शिवसेनेने दगाबाजी केली आहे. लोहा जागेवर भोसरीत भाजपतून आलेला उमेदवार देऊन शिवसेनेने शेकापचं उट्टं काढायला घेतलंय की काय असा समज होऊ लागला आहे. शेकापवरचा राग उद्धव असा काढत असतील तर त्यांना महाविकास आघाडीचं काही पडलंय असं दिसत नाही. रामटेक ही काँग्रेस पक्षाची परंपरागत जागा. तिथे उमेदवार जाहीर करण्याआधीच सेनेने विशाल बरबटे यांचं नाव घोषित करून टाकलं. वणी येथे वामनराव कासावार या सातत्याने विजय घेणाऱ्या काँग्रेस उमेदवाराची घोषणा होण्याआधीच सेनेने संजय दरेकर यांची उमेदवारी जाहीर करून टाकली. घटक पक्षांवर सुरू असलेली कुरघोडी बंडाचं निशाण फडकवायला पुरेशी आहे. सुधीर साळवी यांना शब्द देऊन पुन्हा अजय चौधरींची शिवडीतील उमेदवारी महायुतीच्या पथ्यावर पडणं तितकं शिल्लक आहे. सत्तेची उब घेण्यासाठी भाजपवासी झालेले बाळ माने हे उमेदवारी मिळत नाही म्हणून पुन्हा सेनेत आले. सेनेने त्यांना उमेदवारीही जाहीर करून टाकली. रत्नागिरीत पक्षाला वाचवणारे उदय बने मात्र रस्त्यावरच राहिले. बुलडाणाच्या मेहकरमध्ये निष्ठेने काम करणाऱ्या शिवप्रसाद गोंधळे यांना दूर ठेवत कधीकाळी मंत्र्यांचा पीए असलेल्या सिध्दार्थ खरात यांना उमेदवारी जाहीर करून सेनेने पायावर धोंडा मारून घेतला आहे. बडनेरा संघात सेनेशी एकनिष्ठ असलेल्या प्रिती बंड यांच्याऐवजी सुनिता खराटे यांना उमेदवारी देऊन मातोश्रीवर हनुमान चालिसाबाजी करणाऱ्या रवी राणा यांचा मार्ग मोकळा करून दिला आहे. याचा फटका एकट्या सेनेना बसणार नाही. तो महाविकास आघाडीला पाच वर्षं मागे लोटणारा आहे.



विदर्भ हा काँग्रेसचा बालेकिल्ला असूनही तिथे शिवसेनेने बालहट्ट धरला. अखरेच्या क्षणापर्यंत तिथे निर्णय झालेला नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण करणाऱ्या भारतीय जनता पक्षाला धक्का देण्याच्या तयारीत मतदार असताना या मतदाराला गृहित धरण्याचं पातक केलं जात असेल तर याचा अर्थ काय निघतो? कोणत्याही परिस्थितीत लोकशाहीची वासलात लावणारा भाजप नको, इतक्या एका कारणासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नमतं घेतल्याचा गैरफायदा शिवसेना घेऊ पहात आहे. यातूनच राज्यातील काँग्रेस नेत्यांची तोंडं दाबण्याचे उद्योग दिल्ली दरबारी सुरू आहेत. हे चित्र महाविकास आघाडीला तारणारं नाही.

निवडणूक जाहीर झाल्यापासून महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करा असं टुमणं शिवसेनेकडून लावलं जात होतं. संजय राऊत आणि अनील परब या हौशी कलाकारांनी तर आघाडीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असतील, अशी घोषणाही करून टाकली आहे. मात्र आमदार संख्येवरच मुख्यमंत्री ठरेल, अशी भूमिका शरद पवार आणि नाना पटोले यांनी घेतल्याने अडचण झाली. यदाकदाचित काँग्रेस हा महाविकास आघाडीतील सर्वाधिक आमदारांचा घटक पक्ष ठरला तर मुख्यमंत्री त्या पक्षाचा होणं हे सामान्य गणित होय. मात्र जागा वाटपाची आजची परिस्थिती आणि मुख्यमंत्री जाहीर करण्याची घाई लक्षात घेता शिवसेना ऐनवेळी आघाडीला छोबीपछाड देईल आणि सत्तेसाठी पुन्हा भाजपच्या मांडीवर जाऊन नाही बसली म्हणजे मिळवलं. भाजपला तेच हवंय. सारं विसरून भाजप शिवसेनेला जवळ करेल आणि मुख्यमंत्री पदासाठी शिवसेनाही ते करायला मागेपुढे पाहणार नाही, असं चित्र दिसतंय. यशाच्या शिखरावर जाऊ पहाणाऱ्या महाविकास आघाडीसाठी ती सत्व परीक्षाच ठरेल... पण शिवसेनाही लोकांच्या मनातून कायमची उतरेल, हे त्या पक्षाच्या नेत्यांनी लक्षात घ्यावं..

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)**

# मुंबईत ५१ वे यशस्वी अवयवदान

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील अवयवदानाच्या चळवळीला आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा अवयवदानाने पन्नाशी गाठली आहे. मुंबईतील एका ४२ वर्षीय महिलेच्या अवयवदानातून चार जणांना नवजीवन मिळाले आहे. २४ ऑक्टोबर रोजी एका ४२ वर्षीय महिलेने केलेल्या अवयवदानामुळे मुंबईतील अवयवदानाचा आकडा ५१ वर पोहोचला आहे. या अवयवदानात यकृतदानासह फुप्फुस आणि दोन्ही मूत्रपिंड दान करण्यात आल्याने चार जणांना जीवदान मिळाले.मुंबईतील जसलोक रुग्णालयात ४२ वर्षीय महिलेला प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते; मात्र डॉक्टरांनी योग्य ते उपचार करूनही या महिलेची प्रकृती सुधारली नाही. त्यानंतर, डॉक्टरांनी उपचारादरम्यान तिला मेंदूमृत घोषित केले. डॉक्टरांनी त्यांच्या कुटुंबीयांना अवयवदानासाठी समुपदेशन केले. समुपदेशनानंतर नातेवाइकांनी त्यांचे अवयवदान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, काही अवयवदान करण्यात आले.

## लेबनॉनमधील इमारती जमिनदोस्त करण्यासाठी इस्रायलने वापरला स्मार्ट बॉम्ब

**बैरूत :** सध्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. लेबनॉनमधील बैरूत शहरातील एका इमारतीवर इस्रायलने बॉम्ब टाकल्यानंतर ती काही मिनिटांत जमीनदोस्त झाली. असोसिएटेड प्रेसच्या एका फोटोग्राफरने बॉम्ब पडण्यापूर्वीचा दुर्मिळ क्षण कॅमेऱ्यात टिपला आहे. राखाडी रंगाचे हे स्फोटक एक स्मार्ट बॉम्ब असल्याचे दिसते. हे इस्रायलच्या शस्त्रसाठ्यातील एक शक्तिशाली शस्त्र आहे. इस्रायलने हल्ल्याच्या ४० मिनिटांपूर्वी बैरूतच्या उपनगरातील दोन इमारती रिकाम्या करण्याचा लोकांना इशारा दिला होता. इस्रायलने केलेल्या दाव्याप्रमाणे या इमारतीत हिजबुल्ला संघटनेची केंद्रे होती. बॉम्बस्फोट होण्यापूर्वीचे दृश्य शेअर होताच, शस्त्रास्त्रांचे तज्ज्ञ असलेल्यांनी हा स्मार्ट बॉम्ब असल्याचा दावा केला. या बॉम्बला SPICE बॉम्ब असेही म्हणतात. हा बॉम्ब इस्रायली जेटमधून टाकण्यात आला होता.



### योगींच्या 'बटेंगे तो कटेंगे' विधानाचे RSSकडून समर्थन

# हिंदू समाज एकसंध रहावा ही आमची इच्छा!

वृत्तसंस्था
मथुरा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजेच आरएसएसने मुख्यमंत्री योगी यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या विधानाचे समर्थन केले आहे. मथुरेत शनिवारी पत्रकार परिषदेत सरकार्यवाह दत्तात्रय होसाबळे म्हणाले- हिंदू समाज एकसंध राहिला नाही तर आजच्या भाषेत 'बटेंगे ते कटेंगे' असे होऊ शकते.

ते म्हणाले, समाजात, जातीत आणि भाषेत भेद केला तर आपला नाश होईल. त्यामुळे एकजूट आवश्यक आहे. हिंदू समाजाचे ऐक्य हे लोककल्याणासाठी आहे. ते सर्वांना आनंद देईल. हिंदूंना तोडण्यासाठी शक्ती कार्यरत आहेत. इशारा देणे महत्वाचे आहे.

संघ आणि भाजपमध्ये वाद सुरू आहे का? यावर होसाबळे म्हणाले- आम्ही सार्वजनिक संघटना आहोत. आमचा कोणाशीही वाद नाही. आम्ही भाजप, काँग्रेस, उद्योगपती सर्वांना भेटतो. समाजात द्वेष नसावा, अशी आमची इच्छा आहे.

होसाबळे म्हणाले, अनेक ठिकाणांहून धर्मांतराची प्रकरणे समोर येत आहेत. दुर्गापूजा आणि गणेश विसर्जनाच्या वेळीही हल्ले झाले आहेत. हिंदू समाजाने स्वतःचे रक्षण करून संघटित राहिले पाहिजे.

केरळमधील वायनाडमध्ये भूस्खलन झाले. 1000 स्वयंसेवक सेवा देण्यासाठी आले. हिंदू-मुस्लिम सर्वांना समान मदत केली. जेव्हा मुस्लिम लोक मरण पावले तेव्हा स्वयंसेवकांनी त्यांच्या मान्यतेनुसार त्यांचे अंतिम संस्कार केले.



सीएम योगी यांनी यावर्षी 27 ऑगस्ट रोजी आग्रा येथे पहिल्यांदा म्हटले होते - देशापेक्षा मोठे काहीही नाही. जेव्हा आपण एकत्र राहू तेव्हाच राष्ट्र मजबूत होईल. आपण बांगलादेशात पाहत आहोत की त्या चुका इथे होऊ नयेत... बटेंगे तो कटेंगे, एक रहेंगे, नेक रहेंगे. सुरक्षित राहू आणि समृद्धीच्या शिखरावर पोहोचू. यानंतर 5 ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील ठाणे आणि वाशिममध्ये विविध योजनांच्या पायाभरणीनंतर झालेल्या जाहीर सभेत पीएम मोदी म्हणाले होते - त्यांची व्होट बँक एकच राहील, पण बाकीची सहज विभागली जाईल. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की आपल्यात फूट पडली तर फूट पाडणारे आनंदोत्सव साजरा करतील.

25 आणि 26 ऑक्टोबर रोजी मथुरा येथे संघाच्या दोन दिवसीय अखिल भारतीय कार्यकारी मंडळाची बैठक झाली. यात काय झाले. यावर होसाबळे यांनीही उत्तर दिले...

बांगलादेशच्या संदर्भात भारत सरकारने सर्व समाजांना मदत केली. तिथला हिंदू समाज तिथेच राहील, असाही संघाचा विश्वास होता. पळून जाऊ नये, खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. तिथे हिंदू राहत असेल तर त्याला संरक्षण मिळायला हवे. बांगलादेशातही संघाच्या विचारांशी संबंधित लोक एकमेकांना मदत करत आहेत.

चित्रपटांमध्ये जसा सेन्सॉर बोर्ड असतो तसा OTT वर कायदा आणायला हवा. याचाही सरकारने विचार करावा. मुलांच्या हातात मोबाईल आले आहेत. ज्ञान मिळवणे चांगले आहे, परंतु त्यांना केवळ ज्ञान मिळत नाही. गोष्टी मनाला चंचल बनवतात आणि वाईट सवयी लागतात. यावरही काही नियंत्रण असायला हवे. यापासून मुलांचे संरक्षण केले पाहिजे.

श्रीकृष्ण जन्मभूमीचे प्रकरण न्यायालयात आहे. मला आशा आहे की न्यायालय हा प्रश्न लवकर सोडवेल. अयोध्या प्रश्न सुटला. प्रत्येक केस सारख्याच पद्धतीने हाताळणे आवश्यक नाही. न्यायालयावर विश्वास ठेवा. हिंदू समाज आवाज उठवत आहे, आम्ही त्यांच्यासोबत आहोत.

### झेलेन्स्कींचा मोठा दावा

## रशिया उ. कोरियाच्या सैनिकांना युद्धात उतरवेल, या आठवड्यात तैनाती होईल

वृत्तसंस्था
किव्ह

युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी शुक्रवारी दावा केला की रशिया आता उत्तर कोरियाच्या सैन्याला युद्धात उतरवण्याच्या तयारीत आहे. या आठवड्यात हे सैनिक तैनात केले जातील. दुसरीकडे, पाश्चिमात्य देशांनी म्हटले आहे की, या पावलामुळे युद्ध होईल आणि त्याचा परिणाम इतर प्रदेशांमध्ये, विशेषत: इंडो-पॅसिफिकमध्ये होईल.

झेलेन्स्की यांनी सांगितले की, युक्रेनच्या गुप्तचर संस्थांनी गोळा केलेल्या माहितीनुसार उत्तर कोरियाच्या सैनिकांना रविवार आणि सोमवार दरम्यान युद्धात पाठवले जाईल. युक्रेनच्या गुप्तचर संस्थेने दावा केला आहे की, उत्तर कोरियाने 12 हजार सैनिक रशियाला पाठवले आहेत. यामध्ये 500 अधिकारी आणि 3 जनरलचा समावेश आहे.

याआधी बुधवारी अमेरिकेने दावा केला होता की, उत्तर कोरियाचे 3 हजार सैनिक आधीच रशियात तैनात आहेत. दाव्यानुसार, या सैनिकांना रशियाच्या पूर्व भागातील लष्करी तळांवर प्रशिक्षण देण्यात आले आहे.

गेल्या आठवड्यात 18 ऑक्टोबरला दक्षिण कोरियानेही दावा केला होता की, उत्तर कोरियाने युक्रेन युद्धात रशियाला मदत करण्यासाठी सैन्य पाठवले होते. दक्षिण कोरियाची गुप्तचर संस्था नॅशनल



### पाश्चात्य देश म्हणाले, यामुळे युद्ध भडकेल...

इंटेलिजन्स सर्व्हिसेस (NIS) ने एक निवेदन जारी करून ही माहिती दिली आहे. एजन्सीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, 8 ते 13 ऑक्टोबर दरम्यान 1,500 उत्तर कोरियाचे सैनिक रशियन नौदलाच्या जहाजांवरून रशियाच्या व्लादिवोस्तोक बंदरावर पोहोचले. हे सर्व सैनिक उत्तर कोरियाच्या स्पेशल मिशन फोर्सचा भाग आहेत. उत्तर कोरिया लवकरच रशियामध्ये आणखी काही सैन्य पाठवणार असल्याचा दावा एजन्सीने केला आहे. एनआयएसने सांगितले की, उत्तर कोरियाच्या या सैनिकांना रशियन सैन्याचा गणवेश, शस्त्रे आणि बनावट ओळखपत्रे देण्यात आली आहेत. तैनात करण्यापूर्वी त्यांना रशियन वातावरणाशी जुळवून घेण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. हे सर्व सैनिक रशियाच्या व्लादिवोस्तोक उसुरियस्क, खाबरोव्स्क आणि ब्लागोव्हेशचेन्स्क लष्करी तळांवर राहत आहेत.

पान १ वरुन

### आमदार जोरगेवारांचा भाजपमध्ये प्रवेश

चंद्रपूरमधील भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबत त्यांचे सूर जुळले नाहीत. सुरुवातीला लोकसभेच्या निवडणुकीत त्यांनी ताणून धरले होते. भाजपच्या नेत्यांनी त्यांची समजूत काढल्यानंतर त्यांनी महायुतीचे उमेदवार मुनगंटीवार यांना पाठिंबा जाहीर केला होता. तेव्हापासून ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे बोलले जात होते. विधानसभेची निवडणूक जाहीर होण्यापूर्वी त्यांच्या भाजप प्रवेशाच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. मात्र भाजपच्या कार्यकर्त्यांनी विरोध करणे सुरू केले. मुनगंटीवार यांचीसुद्धा मनापासून इच्छा नव्हती. हे बघता त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे आपला मोर्चा वळवला. शरद पवार यांच्यासोबत चर्चा झाली. त्यांना उमेदवारी देण्याचे जवळपास निश्चित झाले होते. हे कळताच खासदार प्रतिभा धानोरकर यांनी विरोध करणे सुरू केले. लोकसभेच्या निवडणुकीत जोरगेवार यांनी महाविकास आघाडीच्या विरोधात काम केले होते. त्यांना प्रवेश कसा काय द्यायचा ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता.

### 'ईडी'चे देशभरात 13 ठिकाणी छापे

'कोल्डप्ले कॉन्सर्ट' तिकीट काळाबाजारप्रकरणी 'बुक माय शो'ने केलेल्या तक्रारीवरून मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्यात काही संशयित व्यक्ती बनावट तिकीट विक्री किंवा कॉन्सर्टच्या तिकिटांची वाढीव किंमतीने विक्री करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीमध्ये कोणाचेही थेट नाव दिले नसले तरी ३० संशयितांची नावे, मोबाइल क्रमांकांचे मालक, समाज माध्यमांवरील खाते आणि संकेतस्थळ यांची माहिती देण्यात आली आहे. या संशयितांनी वाढीव दराने तिकिटांची पुनर्विक्री केल्याचा आरोप आहे. 'बुक माय शो'च्या विधि विभागाचे महाव्यवस्थापक पूनम मित्रा यांनी दिलेल्या तक्रारीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### "घाबरवण्यासाठी छापेमारी" पुन्हा टार्गेटवर फडणवीस

यावा की गृहमंत्र्यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नेमणुकांसंदर्भात आपल्या पदाचा गैरवापर केला होता. तसंच पोलिसांच्या कर्तव्यपालनात हस्तक्षेप केला होता. परमबीर सिंह यांचं वर्तन अतिशय संशयास्पद होतं. त्यांच्याच विरोधात राज्य पोलीस, भ्रष्टाचारविरोधी पथक आणि सरकारकडून चौकशी सुरू होती. 'अंबानी विस्फोटक कांड' आणि 'मनसुख हत्याकांड' प्रकरणातील भूमिकेवरून माध्यमांनी परमबीर सिंह यांच्याकडेच अंगुलिनिर्देश केला होता आणि नंतरच्या तपासात संशयाची सुई त्यांच्याभोवतीच फिरत होती. महत्त्वाचं म्हणजे, त्यांचा एकदम खास माणूस असलेल्या सचिन वाझेला अटक झाली होती आणि दुसरा खास माणूस असलेल्या प्रदीप शर्माला अटक होणार होती. अशा व्यक्तीच्या (परमबीर सिंह) जबाबांचा आधार घेतला गेला.

# भाजपने केजरीवाल यांना मारण्याचा प्रयत्न केला, संजय सिंह यांचा आरोप

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर पदयात्रेदरम्यान हल्ला झाला. या हल्ल्यासाठी आपने भाजपला जबाबदार ठरवले आहे. आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर झालेल्या हल्ल्याबाबत मोठा दावा केला आहे. भाजप अरविंद केजरीवाल यांना मारण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. भाजपच्या द्वेषाच्या राजकारणाने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, ते अरविंद केजरीवाल यांचा जीव घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप



संजय सिंह यांनी केला आहे.

पश्चिम दिल्लीतील विकासपुरी येथे पदयात्रेदरम्यान अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला करण्यात याला. भाजपने पाठवलेल्या गुंडांनी केजरीवाल यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असा आरोप आपने केला आहे. दरम्यान आपचे खासदार संजय सिंह यांनीही भाजपवर निशाणा साधला. ‘तुरुंगात असताना अरविंद केजरिवाल यांचे इन्सुलिन बंद करण्यात आले. जेव्हा सुप्रिम कोर्टाने अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला तेव्हा ते AAP चा प्रचार करत होते. भाजप केंजरिवालांवर हल्ला करत आहे. तुमच्यात नेमका द्वेष तरी किती आहे? मात्र कितीही द्वेष असला तरी तुम्ही केजरीवाल यांना हरवू शकत नाही. म्हणूनच तुम्ही त्यांना संपवण्याचा प्रयत्न करत आहात. असे संजय सिंह म्हणाले.

विकासपुरीत अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला करण्यासाठी भाजपचे गुंड आले असून या घटनेत पोलिसांचाही हात आहे. असा गंभीर आरोप संजय सिंह यांनी केला. ‘हल्लेखोर रोहित सेहरावत हा दिल्ली भाजप युवा शाखेचा उपाध्यक्ष आहे. दुसरा हल्लेखोर अरुण ढल हा देखील भारतीय जनता युवा मोर्चाचा सरचिटणीस आहे. अरविंद केजरीवाल यांच्यावर झालेल्या हल्ल्यामागे रोहित सेहरावत हा मुख्य आरोपी आहे. रोहित सेहरावतचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत फोटो देखील आहेत. दिल्लीतील भाजपचे अध्यक्ष सचदेवा या हल्लेखोरांचा बचाव करत आहेत. जर तुम्ही अरविंद केजरीवाल यांना मारण्याचा प्रयत्न केला किंवा जर त्यांच्यासोबत काही अनुचित प्रकार घडला तर त्याला भाजप जबाबदार असेल, असे संजय सिंह यांनी म्हटले आहे.

## तेलुगू अभिनेता एनटी रामास्वामींना मारहाण

वृत्तसंस्था
बंगळुरु

तेलुगू अभिनेता एनटी रामास्वामी यांच्यावर हैदराबादमधील थिएटरमध्ये हल्ला झाला. ही घटना अंजन रामचंद्र यांच्या 'लव्ह रेड्डी' या नवीन चित्रपटाच्या स्क्रीनिंगनंतर घडली. रामास्वामी यांनी चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारली आहे. चित्रपट पाहिल्यानंतर एका महिलेला इतका राग आला की तिने थेट स्टेजवर जाऊन अभिनेत्याला मारहाण केली. या घटनेचा व्हिडीओ इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

व्हायरल व्हिडीओमध्ये असं दिसतंय की थिएटरमध्ये हा चित्रपट सुरू आहे आणि त्यानंतर चित्रपटा सगळे कलाकार समोर स्टेजवर उभे राहतात. तेवढ्यात एक महिला स्टेजवर येते आणि एनटी रामास्वामी यांना मारहाण करण्यास सुरुवात करते. सर्वात आधी महिलेने अभिनेत्याची कॉलर धरली आणि नंतर मारहाण करायला सुरुवात केली. महिला आली आणि तिने मारलं हे काही क्षणातच घडलं त्यामुळे रामास्वामींनाही समजू शकत नाही की नेमकं काय होतंय. त्यानंतर इतर लोक महिलेला तिथून दूर नेताना

## सरकारनं वाढवली ITR फाईल करण्याची मुदत

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सेंट्रल बोर्ड ऑफ डारेक्ट टॅक्सने कॉरपोरेट्ससाठी एक असेसमेंट इअर २०२४-२५ साठी इनकम टॅक्स रिटर्न दाखल करण्याची मर्यादा वाढवलीय. जर मर्यादा वाढवण्यात आली नसती तर व्यावसाय आणि रिटर्न भरण्याची टेन्शन वाढलं असतं. दरम्यान इनकम टॅक्स रिटर्नबाबत काय नियम आहे, ते जाणून घेऊ.

व्यापाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सने कॉरपोरेट्ससाठी असेसमेंट इअर २०२४-२५ साठी मर्यादा वाढवण्यात आलीय. कॉरपोरेट्स लोकांना आता १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत इनकम टॅक्स रिटर्न भरता येणार आहे. आधीही ही मुदत ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत होती. त्यात आता वाढ करण्यात आली.

सरकारने म्हटले आहे की, हा विस्तार प्राप्तिकर कायदा, १९६१ च्या कलम १३९ च्या उप-कलम (1) अंतर्गत समाविष्ट असलेल्या करदात्यांना लागू होतो. विशेष रुपाने हा विस्तार सरकारद्वारे टॅक्स ऑडिट रिपोर्ट जमा करण्याची मर्यादा ३० सप्टेंबर २०२४ हुन ७ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली होती.

## दुचाकीस्वारांवर ट्रक पलटी, पिता-पुत्रासह चार ठार

### ट्रक ओव्हरटेक करून पुढे गेला, गायीला धडकला आणि उलटला

वृत्तसंस्था
सेंधवा

मध्यप्रदेशातील बडवानी येथे ट्रकने एका गायीला धडक दिली, त्यानंतर दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांवर उलटला. या अपघातात 4 जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये वडील, मुलगा, पुतण्या आणि शेजाऱ्यांचा समावेश आहे. ट्रक चालक व त्याचा साथीदार फरार झाला. सेंधवा येथील जुना एबी रोडवरील उच्च माध्यमिक विद्यालयासमोर शुक्रवारी रात्री एक वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. ट्रकखाली दबलेल्या लोकांना क्रेनच्या मदतीने बाहेर काढण्यात आले.

प्रत्यक्षदर्शी साकिब शेख यांनी सांगितले की, आम्ही सेंधवा येथील नवीन बसस्थानकावरून घरी परतत होतो. अचानक एक भरधाव ट्रक ओव्हरटेक करून समोरून गेला. सरकारी शाळेजवळ पोहोचताच आधी गायीला धडकला आणि उलटला. ट्रक उलटल्यानंतर अर्ध्या तासात क्रेनच्या साह्याने तो सरळ करण्यात आला, तोपर्यंत सर्वांचा मृत्यू झाला होता.

चौघेही रस्त्याच्या कडेला उभे होते सर्व मृत नागलवाडीतील सालिकाला येथील रहिवासी होते. रिंगानिया मेहता आणि त्यांचा मुलगा दुचाकीवर होते. रिंगणियाचा भाचा बबलू आणि शेजारी श्यामलाल हे रस्त्याच्या कडेला उभे होते. त्यानंतर हा अपघात झाला. चौघेही सेंधवा येथील एका खासगी जिनिंगमध्ये मजूर म्हणून काम करायचे. रात्री उशिरा काम आटोपून ते शहरापासून 10 किमी अंतरावर असलेल्या सलिकाला या गावी परतत होते.

**अपघातात मृत्यू**

1. रिंगानिया (40) वडील जादियन मेहता 2. जितेंद्र (18) वडील रिंगानिया मेहता 3. बबलू (17) वडील पुनिया मेहता 4. श्यामलाल (35) वडील नंगा बडवा मेहता

## प्रेयसीचा लग्नासाठी तगादा, मित्रांकडून प्रेयसीची हत्या

**नवी दिल्ली ।** राजधानी दिल्ली येथील नांगलोई येथील खळबळजनक हत्याकांड घडल्याची घटना समोर आली आहे. कट्टरपंथी संजू आणि त्याच्या काही मित्रांनी १९ वर्षीय युवतीचा गळा चिरून तिची हत्या केली असून तिला जमिनीत गाडल्याचे हैवानी कृत्य केले.यावेळी पीडितेला तिच्या कुटुंबीयांनी विचारले असता, ती भूताशी बोलत असल्याचे तिने सांगितले होते. पीडित मुलगी ही सध्या ७ महिन्यांची गरोदर असून ती लग्नासाठी आग्रही होती. तर दुसरीकडे संजूला हे मूल हवे होते आणि तो अद्यापही लग्नासाठी तयार होत असल्याचे पीडितेचे म्हणणे आहे. पीडित युवती आणि युवक दोघांमध्ये नेहमी वाद व्हायचे, दरम्यान २१ ऑक्टोबर रोजी पीडित युवती घरातील काही महत्त्वाच्या वस्तू घेऊन संजूकडे गेली आहे. संजू त्याच्या दोन मित्रांसह तिला रोहतकला घेऊन गेला होता. त्यावेळी रोहतक येथे पीडितेची हत्या केली आणि मृतदेह गाडण्यात आल्याची काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली.

## अभ्यासाचा ताण सहन न झाल्याने दिल्लीत मुलीची आत्महत्या

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्लीतील ओखला परिसरात एका 17 वर्षीय विद्यार्थ्याने 7 मजली इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना गुरुवारी घडली. तरुणी ओखला मेन मार्केटमध्ये राहत होती.

मुलगी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर जेईईची तयारी करत होती. तिने एक सुसाइड नोट लिहिली असून त्यात तिने अभ्यासाचे दडपण सहन होत नसल्याचे लिहिले आहे.




घरच्यांना तिच्याकडून खूप अपेक्षा होत्या पण ती त्या पूर्ण करू शकली नाही.

तरुणीने आत्महत्या केल्याचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. इमारतीच्या गेटवर लावण्यात आलेल्या कॅमेऱ्यात हा व्हिडिओ रेकॉर्ड झाला आहे.

काही लोक रस्त्यावरून येत असल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्यानंतर मुलीने सात मजली इमारतीवरून उडी मारली. खाली पडताच मुलीचा मृत्यू झाला.

# जिनपिंग कमलांशी लहान मुलाप्रमाणे वागतील - ट्रम्प

### राष्ट्राध्यक्ष झाल्या तर त्यांच्याशी स्पर्धा करू शकणार नाही; आयकर रद्द करण्याचे आश्वासन

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी सांगितले की, कमला हॅरिस राष्ट्राध्यक्ष झाल्या तर चीनचे राष्ट्राध्यक्ष त्यांच्याशी लहान मुलासारखे वागतील. न्यूज एजन्सी एपीने दिलेल्या माहितीनुसार, ट्रम्प यांनी एका पॉडकास्टमध्ये हे वक्तव्य केले आहे.

यामध्ये होस्टने ट्रम्प यांना विचारले की, जर कमला जिंकल्या तर जिनपिंग त्यांच्याशी कसे वागतील? यावर ट्रम्प म्हणाले- अगदी लहान मुलासारखे. ते त्यांच्याकडून सर्व काही काढून घेतील. कमलांना कळणार नाही काय होतंय.

ट्रम्प म्हणाले की, जिनपिंग आणि कमला हे तसेच असतील जसे बुद्धिबळात नवशिका आणि ग्रँड मास्टरमध्ये स्पर्धा होते. ट्रम्प



यांनी याआधीही कमला हॅरिसना अनेकवेळा 'आळशी', 'मूर्ख', 'व्यसनी' असे संबोधले आहे.

ट्रम्प यांना विचारण्यात आले की, अमेरिकेत कधी आयकर रद्द होऊ शकतो का? प्रत्युत्तरात ते म्हणाले की अमेरिका 19व्या शतकातील आर्थिक धोरणांकडे परत येऊ शकते. त्यावेळी अमेरिकेत आयकर नव्हता.

ट्रम्प पुढे म्हणाले, तेव्हाही शुल्क प्रचलित होते. पण आयकर नव्हता. आपल्या देशात असे लोक आहेत जे मरत आहेत आणि त्यांना कर भरण्यास भाग पाडले जाते. पुढील कर भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसेच शिल्लक नाही. मात्र हे कसे चालेल हे ट्रम्प यांनी स्पष्ट केले नाही. कॉर्पोरेट आयकर रद्द करायचा की फक्त वैयक्तिक आयकर रद्द करायचा हेही त्यांनी स्पष्ट केले नाही. न्यूयॉर्क टाईम्सच्या मते, डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही आर्थिक तज्ज्ञांनी ट्रम्प यांची कल्पना नाकारली आहे. ते म्हणाले की, ट्रंप यापूर्वीही आयकर रद्द करण्याबाबत बोलत आहेत, परंतु त्याची अंमलबजावणी करणे शक्य नाही.

तथापि, ट्रंप म्हणाले की, शुल्क दर वाढवणे आणि आयकर काढून टाकणे अमेरिकेची कर प्रणाली बदलेल. देश मजबूत होईल. ते म्हणाले की, केवळ श्रीमंत लोकच प्राप्तिकर भरतात, परंतु प्रत्येकाचा टॅरिफ प्रणालीमध्ये समावेश आहे. आर्थिक तज्ज्ञांच्या मते, शुल्कामुळे कपडे आणि किराणा माल यासारख्या मूलभूत वस्तूंच्या किमती वाढतात. यामुळे गरीब अमेरिकन लोकांसाठी आणखी समस्या निर्माण होतात कारण ते त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग मूलभूत गोष्टींवर खर्च करतात.


# गेल्या वर्षी अमेरिकेत दर तासाला 10 भारतीयांना अटक

### बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याचा आरोप, 50% पेक्षा जास्त गुजराती होते

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

गेल्या वर्षी बेकायदेशीरपणे अमेरिकेत प्रवेश केल्याप्रकरणी दर तासाला 10 भारतीयांना अटक करण्यात आली होती. यूएस कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शन (CBP) विभागाने ऑक्टोबर 2023 ते सप्टेंबर 2024 या कालावधीत बेकायदेशीरपणे देशात प्रवेश करणाऱ्या लोकांचा डेटा जाहीर केला आहे.

या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी 29 लाख लोकांना बेकायदेशीरपणे सीमा ओलांडल्याबद्दल अटक करण्यात आली होती. त्यापैकी 90,415 भारतीय होते. त्यापैकी 43,764 जणांना अमेरिका-



कॅनडा सीमेवरून अटक करण्यात आली. भारतीय एजन्सींच्या मते, सीमा ओलांडणारे 50% पेक्षा जास्त भारतीय गुजरातचे होते. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत हा आकडा कमी झाला आहे. 2022-23 या वर्षात 96,917 भारतीयांना अवैध सीमा ओलांडल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती.

कॅनडाच्या बॉर्डर क्रॉसिंग डेटावरून असे दिसून आले आहे की भारतीय आता मेक्सिकोच्या अंधुक मार्गाऐवजी कॅनडाला त्यांची पहिली पसंती म्हणून वापरत आहेत. वास्तविक, अमेरिकेने मेक्सिको सीमेवर सतर्कता वाढवली आहे.

त्याच वेळी, कॅनडाहून सीमा ओलांडणे मेक्सिकोपेक्षा सोपे आहे. कॅनडाचा व्हिसा घेतलेले भारतीय तेथून टॅक्सीने सीमा पार करून अमेरिकेत पोहोचतात. मात्र, अलीकडच्या काळात अमेरिकेने येथेही चेकपोस्ट कडक केले आहेत.

मात्र, वृत्तानुसार, कॅनडा सीमेवरून अटक करण्यात आलेल्या भारतीयांची संख्या सीमा ओलांडणाऱ्यांपेक्षा खूपच कमी आहे. भारतातून अमेरिकेत पोहोचण्यासाठी एका डंकीची सरासरी किंमत 20 ते 50 लाख रुपये आहे. काही वेळा हा खर्च 70 लाख रुपयांपर्यंत पोहोचतो. या कामात गुंतलेले एजंट लोकांना वचन देतात की ते जितके जास्त पैसे देतात तितका त्रास कमी होईल.